# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३१ | बुधवार,दि.९ जुलै २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# जिल्ह्यात संततधार, नदी,नाल्यांना पूर अनेक रस्ते बंद





**गोंदिया :-** जुलै महिन्याला सुरुवात झाली तरी जिल्ह्यात दमदार पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. पण, रविवारी रात्री आणि सोमवारी (दि. ७) सकाळच्या सुमारास झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांसह जिल्ह्यावासीयांना दिलासा दिला. जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस असल्याने अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक बंद करण्यात आले आहेत. जिल्ह्यात आज होत असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून जिल्ह्यात ११०.६ मिमी इतक्या अतिवृष्टीची नोंद झाली आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील सर्व शाळा व शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.मध्य प्रदेशातील शिवनी जिल्ह्यातील संजय सरोवर धरणाचे दोन गेट ३ फुट उंचीपर्यंत उघडण्यात आले असून, यामुळे वैनगंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वैनगंगा नदीकाठच्या गावातील नागरिकांनी देखील सतर्क रहावे. जिल्हा प्रशासनाने सर्व आपत्कालीन यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सुचना दिल्या आहे.

हवामान विभागाने यंदा पाऊस सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता वर्तविली होती. तसेच मान्सून मे महिन्यातच सक्रिय झाला. पण, जून महिना पूर्ण लोटूनही जिल्ह्यात दमदार पावसाने हजेरी लावली नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या काळजीत भर पडली होती. नदी, नाल्यांनासुद्धा पावसाची प्रतीक्षा होती. रविवारी (दि. ६) रात्रीपासूनच पावसाची रिपरिप सुरू होती. सोमवारी सकाळी ६ वाजतापासून सुरू झालेल्या पावसाचा जोर मंगळवारलाही कायम होता. जिल्ह्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावल्याने धानाचे पऱ्यांना संजीवनी मिळाली असून रोवणीच्या कामाला वेग येण्याचा मार्ग मोकळा झाला. दमदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

भंडारा जिल्ह्यात बावनथडी नदीवर बांधकाम करण्यात आलेल्या महाराष्ट्र मध्यप्रदेश आंतरराज्य पुलावरून आज मंगळवारी सकाळपासून वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुलावरून वाहतूक धोकादायक असल्याच्या कारणावरून सिहोरा पोलिसांनी बपेरा गावाच्या सीमेत वाहने रोखली आहेत. बावणथडी नदीच्या पुराच्या पातळीत वाढ होत असल्याने सिहोरा गावाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासन पूर परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे.

## कवलेवाडा येथे घराचे छत कोसळले

**तिरोडा तालुक्यातील मौजा-कवलेवाडा येथे सोमवारी दुपारी १२ वाजता सुमारास एका घराचे छत कोसळल्याची घटना घडली. बुधाराम दुधबरैया यांचे राहते घर पावसामुळे कमकुवत झाले होते. परिणामी, सोमवारी अचानक घराचे छत पूर्णतः कोसळले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केलीौकोणतीही आपत्कालीन माहिती किंवा मदतीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष यांच्याशी ०७१८२० २३०१९९६, २३६१२४ या क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, विशेषत शेतकरी बांधवांनी, या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर सावध राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे**



## पुरामुळे खालील रस्ते बंद

**वडेगाव ते खोलदा**
**दिनकरनगर ते करांडली**
**प्रतापगढ ते कडोली**
**प्रतापगढ ते रामनगर**
**इळदा ते वडेगाव**
**चिचेवाडा ते मुरदोली**
**डवकी ते शिलापुर**
**गोटाबोडी ते बोरगाव**
**शेडेपार रस्ता**
**सिंगनडोह-रोपा**
**ककोडी-चिल्हाटी**
**चिचगड-देवरी-परसोडी**
**बोरी-मांडोखाल**
**कोरंबीटोला-मांडोखाल**
**सिलेझरी-येरंडी( विहीरगाव )**
**महागाव-शिरोली-ईटखेडा**
**बोंडगावदेवी-खांबी व**
**चान्ना ते बोंडगावदेवी**





**तिरोडा तालुक्यातील घाटकुरोडा-घागरा व अर्जुनी ते गोंडमोहाडी-किंडगीपार नाल्यावरील पुलावरुन पाणी वाहत असल्याने रस्ता वाहतुकीकरिता बंद झालेला आहे.**

# राज्यात रिक्त पदांसाठी लवकरच 'मेगा भरती'- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/गोंदिया:-** राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम (रिक्रुटमेंट रूल) सुधारित करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे, आदी उद्दिष्टे दिली आहेत. या उद्दिष्ट पूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन ममेगा भरतीफ करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थिती केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६,८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहे. मात्र त्यांना २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदावर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही. पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील. अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही.

अधिसंख्य असलेली ६ हजार ८६० पदे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भरती करण्याकरिता रिक्त झालेली आहे. त्यापैकी १३४३ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ब्लॉक चेन पद्धतीवर अभिलेख आणण्याबाबत शासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी करताना कागदपत्रे तपासणे सोयीचे होईल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सक्षम करण्यात येत आहे. अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत सचिवांचा गट तयार करण्यात येईल. या गटाच्या माध्यमातून अभ्यास करून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने सफाई कामगारांची पदे वारसा हक्काने भरण्याबाबत असलेली स्थगिती उठवलेली आहे. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ही पदे वारसा हक्काने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या पदांसाठीही भरतीही करण्यात येणार आहे.

## धापेवाडा बॅरेजचे सर्व २३ दरवाजे उघडले

**गोंदिया-** जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असून हवामान विभागाने पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तर धरणातून सुध्दा मोठ्या प्रमणात पाण्याचा विसर्ग सुरु आहे.(दि.८) दुपारी तिरोडा तालुक्यातील वैनगंगा नदीवरील धापेवाडा बॅरेजचे संपुर्ण २३ दरवाजे उघडण्यात आले.यातून १ लाख ८३ हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरु होता. जोरदार पावसामुळे वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे त्यामुळे बॅरेजमधून पाणी सोडण्यात येत आहे. नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाने दिला आहे. जिल्हयातील गोंदिया ७९.२ मिमी, आमगाव ५३.२ मिमी,तिरोडा १२० मिमी,गोरेगाव ५९.५ मिमी,सालेकसा ७५.७ मिमी,देवरी १९८ मिमी,अर्जुनी मोरगाव २०६.९ मिमी,सडक अर्जुनी ७४.०मिमी असे एकूण ११०.६ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

पूजारीटोला धरणामधून बाघ नदीमार्गे मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले जात आहे.मध्यप्रदेशातील संजय सरोवर धरणातून सुद्धा मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे, हे पाणी बाघ नदीमार्फत बिरसोला घाटाजवळ वैनगंगा नदीला मिळते, त्यामुळे ९ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत वैनगंगा नदीचाही जलस्तर वाढण्याची शक्यता आहे.

# कासा-काटी पुरग्रस्त गावातील अकरा गरोदर मातांना ग्रामीण रुग्णालय रजेगाव येथे हलविले



**गोंदिया :** जिल्ह्यात ७ व ८ जुलै पासुनच्या सततधार पावसामुळे सर्वत्र अतिवृष्टी सुरू आहे. गोंदिया तालुक्यातील कासा-काटी मार्ग वैनगंगा नदी व बाघ मार्ग नदी पुरामुळे बंद झाले होते.सदर पुरग्रस्त गावातील गरोदर मातांना प्रसूती संबंधाने आरोग्य विभागाने त्या कार्यक्षेत्रातील अकरा गरोदर मातांना वेळीच प्रसंगावधाने ग्रामीण रुग्णालय रजेगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकेन हलविलेची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र काटीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शुभम गौतम यांनी दिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र काटी अंतर्गत उपकेंद्र कासा कार्यक्षेत्रातील पुजारीटोला येथील महिमा पाचे,नेहा कावरे,नमिता चौधरी व उमिता माने तर ब्राम्हणटोला येथील सरिता जमरे,अश्विनी चौधरी,हेमलता मरठे व ज्ञानेश्वरी खरे तसेच कासा येथील सुषमा चौधरी,सुलोचना चौधरी व आरती पाचे असे एकुण अकरा गरोदर मातांना त्यांची अपेक्षित प्रसूतीची तारीख जवळ असताना गुंतागुंत होऊ नये म्हणून तात्काळ ग्रामीण रुग्णालय रजेगाव येथे भरती करुन मोलाची कामगिरी केली आहे.

जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी मुळे लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न उदभवु नये म्हणुन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी सर्व तालुका आरोग्य अधिकारी,वैद्यकीय अधिकारी,आरोग्य कर्मचाऱ्याना मुख्यालयी राहुन नदीकाठच्या गांवावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले आहेत.

# प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने



**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित मागण्या रखडल्याच्या निषेधार्थ बुधवारी (दि. ९) दुपारी १ ते ३ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.

सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद, शिक्षक, शिक्षकेतर व नगरपालिका, नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीची बैठक रविवारी (दि. ६) येथील मध्यवर्ती संघटनेच्या कार्यालयात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. मागण्यांच्या पूर्ततेसाठी वारंवार पत्रव्यवहार व चर्चांचे प्रयत्न होऊनही शासनाने कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.

मार्च २०२३ मध्ये झालेल्या बेमुदत संपानंतर दिलेली आश्वासनेदेखील पूर्ण झालेली नाहीत. या सर्व पार्श्वभूमीवर कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरली आहे. याशिवाय, ६ सप्टेंबर २०२३ रोजी काढलेल्या आदेशानुसार सर्व विभागातील वर्ग १ ते ४ चे कर्मचारी कंत्राटी पद्धतीने बाह्य कंपनीमार्फत भरले जाणार आहेत. यामुळे भविष्यात शासकीय कर्मचाऱ्यांचे अस्तित्वच धोक्यात येणार असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या निदर्शनांच्या वेळी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे.

बैठकीला मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर वैद्य, निमंत्रक लीलाधर पाथोडे, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा अध्यक्ष पी. जी. शहारे, ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, तसेच आशिष रामटेके, संतोष तोमर, सौरभ अग्रवाल, भगीरथ नेवारे, राकेश डोंगरे, रमेश नामपल्लीवार, तु बा. झंजाड, विश्वनाथ कापगते, डी. एल. गुप्ता, उमेश कावरे, सुरेश आष्टिकर, नीतेश बांते, जितेंद्र अदमाने, विदेश सासरे, मोहनलाल पटले यांच्यासह विविध विभागातील मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते. देशभरातील ११ प्रमुख कामगार संघटनांनी पुकारलेल्या या देशव्यापी संपात जिल्ह्यातील कर्मचारीदेखील उत्स्फूर्त सहभाग नोंदविणार आहेत.

# मासूलकसा घाटात उड्डाण पुलाला पडल्या भेगा,रस्त्यावर दरड कोसळल्याने एकेरी वाहतूक



**गोंदिया:** बारा तासांपेक्षा अधिक काळ सतत कोसळलेल्या पावसाने मंगळवारी शहरातसह संपूर्ण जिल्हाला पावसाने झोडपले.जिल्ह्यातील २१ मार्ग वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. विशेष म्हणजे, मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील मासुलकसा घाट परिसरात दरड कोसळल्याने महामार्गावर एकेरी वाहतूक करण्यात आली आहेौदेवरी तालुक्यातील मराम जोब मासूलकसा घाट परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्रं.५३ वरील उड्डाण पुलाला पहिल्याच पावसात भेगा पडल्याने अग्रवाल ग्लोबल कंपनीचे पितळ उघड पडले आहे.अवघ्या सहा महिन्यापूर्वी मासूलकसा घाट परिसरातील उड्डाण पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आणि पहिल्याच पावसात महामार्गाला तडे पडले, यामुळे वाहनधारकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

## धरणांतील साठ्यात वाढ

जिल्ह्यातील बहुतांश प्रकल्पांनी तळ गाठला होता. दोन दिवसातील जोरदार पावसाने सर्वच धरणांतील साठ्यात वाढ झाली आहे. ९ मध्यम प्रकल्पात १५.१० दलघमी, २० लघु प्रकल्पांत १६.५९० दलघमी, ३८ मामा तलावांत २.५९६ दलघमी असा २३.६८५ दलघमी साठा झाला आहे. तिरोडा तरलुक्यातील भूराटेला मध्यम प्रकल्प ९७.४२ टक्के भरला आहे. मोठया प्रकल्पांती साठ्याचा विचार केल्यास पुजारीटोला ४५ टक्के, कालीसरार १० टक्के, सिरपूर १४ टक्के, इटियाडोह २६ टक्के साठा झाला आहे.

# विरोधी पक्षनेतेपदासाठी आक्रमक व्हा;शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरेंचे आमदारांना आदेश



**मुंबई:-**विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. मात्र या अधिवेशनात देखील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. महाविकास आघाडीला ते मिळावं अशी अपेक्षा आहे. मात्र ते अद्याप ही विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेलं नाही. वारंवार पत्र देऊन देखील अध्यक्ष विरोधी पक्षनेतेपद विरोधकांना देत नसल्याची भावना मविआमध्ये आहे. त्यासाठी आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष विधानसभेत आक्रमक होणार आहे. या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी आमदारांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी विरोधी पक्षनेतेपदासाठी विधानसभेत आक्रमक व्हा असे आदेश दिले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी पक्षातील आमदारांची बैठक घेतली. विरोधी पक्षनेतापद अजून ठाकरे गटाला का मिळालं नाही याची चर्चा झाली. त्याबद्दल सभागृहात प्रश्न का उपस्थित केले जात नाहीत? असा प्रश्न त्यांनी सर्वांसमोर उपस्थित केला. याआधी शिवसेनेचे आमदार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दालनात जावून पत्रव्यवहार करायचे. मात्र उद्यापासून त्यांच्या दालनात न जाता सभागृहात सर्व आमदारांनी या विषयी आवाज उठवावा असं ठाकरे यांनी सागितलं.त्यामुळे आता थेट सभागृहात अध्यक्षांना जाब विचारला जाणार आहे. तशी रणनिती उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेनं केली आहे. जर सभागृहात थेट अध्यक्षांना विचारलं तर ते थेट पाटलावर ठेवलं जाईल. या उद्देशाने उद्धव ठाकरे यांनी या सूचना दिल्या आहेत. दरम्यान यावेळी अधिवेशनात आमदारांच्या कामगिरीचा आढावा ही यावेळी उद्धव ठाकरे यांनी घेतला. रोज सकाळी विरोधी पक्षाचं विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन होतं. पण ते ज्या पद्धतीनं व्हायला पाहीजे ते होत नाही याबाबतही उद्धव यांनी नाराजी व्यक्त केल्याचं समजत आहे.

गेल्या काही दिवसांपासून विधिमंडळाच्या पायऱ्यांवर हातावर मोजण्या इतके विरोधक आंदोलन करत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार या आंदोलनास उपस्थित का राहत नाहीत असा देखील सवाल उद्धव ठाकरेंनी या बैठकीत उपस्थित केला. उद्यापासून सर्व आमदारांना आंदोलनास उपस्थित राहून विरोधकांचे प्रश्न कठोरपणे मांडण्याच्या सूचना उद्धव ठाकरेंनी दिल्या आहेत. या बैठकीनंतर शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांचे नवे रूप सभागृहात आणि सभागृहा बाहेर बघायला मिळेल असं बोललं जात आहे.

# राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजणार

## निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिकाऱ्यांची बैठक



**मुंबई:-**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकीकडे राजकीय पक्ष कामाला लागले असून दुसरीकडे राज्य निवडणूक आयोगानेही मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठीच, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने बैठकीसाठी बोलावलं आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील निवडणूक पूर्व परिस्थितीचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे. त्याअनुशंगाने जिल्हाधिकाऱ्यांना बैठकीसाठी काय तयारी करायची आणि काय माहिती घेऊन हजर राहायचे याबाबतही सांगण्यात आलं आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ हाच या बैठकीचा विषय असून १० जुलै रोजी दुपारी १२ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ही बैठक होणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी काळात घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीच्या (महानगरपालिका वगळून) पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा मा. राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेणार आहेत. या बैठकीमध्ये खालील विषयांचा आढावा घेण्यात येईल, असे परिपत्रकच राज्य निवडणूक आयोगाने काढले आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सोबतच्या परिपत्रामध्ये माहिती तयार करून ती आयोगास PDF$ F$ormat मध्ये ई-मेलद्वारे ९ जुलै २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यात यावी. तसेच उक्त नमूद सर्व मुद्यांसंदर्भातील माहितीसह व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या बैठकीस आपण व्यक्तिशः उपस्थित राहावे, ही विनंती. सदर व्हिडिओ कॉन्फरन्सची लिंक यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल,असे या परिपत्रकात सांगण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी याबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना लिहिले आहे. तसेच, उपरोक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या बैठकीस आपण उपस्थित राहावे, असेही सांगण्यात आले आहे.

साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.०९ जुलै २०२५ २

## संपादकीय

# खरे नक्षलवादी कोण?

जे लोक देवाला मानत नाही असे नास्तिक लोक वारीमध्ये घुसलेले आहे.हे लोक शहरी नक्षलवादी आहेत असे म्हणत येणाऱ्या काळात येऊ घातलेल्या जन सुरक्षा कायदा अंतर्गत त्यांना अटक करावी असे विधान शिवसेना शिंदे गटाच्या विधान परिषद सदस्य ॲड.मनीषा कायंदे यांनी केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात वाद पेटला असून खरे वारकरी कोण यावर जोरदार चर्चा सुरू आहे.महाराष्ट्राच्या भूमीत अनेक वर्षापासून आमच्या महान संतांचा खरा विचार प्रबोधनाच्या माध्यमातून सांगणारी पुरोगामी संघटनांची काही मंडळी संविधान,पर्यावरण,लोकायत हे विषय घेऊन वारीमध्ये लोकांचे प्रबोधन करीत असतात.त्या माध्यमातून महाराष्ट्राच्या आठशे वर्षाच्या महान संत परंपरेला नव्याने उजळणी देण्याचे काम करतात. वारकऱ्यांना खरा धर्म समजावून सांगतात आणि आमच्या संतांनी त्या त्या काळात केलेले प्रबोधन आधुनिक काळातही कसे उपयुक्त आहे हे वारीतील लोकांना सांगतात.

हीच गोष्ट काही कट्टरवादी धर्मांध लोकांना सहन होत नसल्यामुळे पुरोगामी विचाराच्या लोकांना ते अर्बन नक्षलवादी ठरवायला लागले आहेत.याच धर्ममार्तंडांनी वारीमध्ये हातात तलवारी घेऊन धारकरी घुसवले आणि वारीच्या महान परंपरेला कलंकित करण्याचे काम केले. महाराष्ट्रात सतत द्वेषाची पेरणी करणाऱ्या मनोहर भिडे यांनी मागील काही वर्षांमध्ये महाराष्ट्राचे वातावरण पूर्णतः खराब करून तरुण पिढीचे मेंदू इतर धर्माच्या द्वेषाने विषारी आणि विखारी बनवण्याचे काम सुरू केले आहे.याच भिडेंनी आमच्या बहुजन तरुणांना धारकरी हे नाव देऊन हातामध्ये तलवारी देऊन वारीमध्ये घुसवले. एवढेच नाही तर ज्ञानोबा–तुकोबांनी हिंदू धर्म नासवला अशा प्रकारचे अत्यंत संतापजनक वक्तव्य केले आणि हीच विषमतावादी मंडळी संविधान,पर्यावरण याचे महत्त्व वारकऱ्यांना सांगणाऱ्या खऱ्या प्रबोधनकारांना आता नक्षलवादाचा शिक्का मारायला लागले आहे.ज्यांनी पूर्वीपासून आमच्या महान संत परंपरेचा द्वेष केला, त्यांना त्रास दिला, त्यांच्या गाथा नदीमध्ये बुडवल्या, त्यांच्यावर बहिष्कार टाकला,त्यांच्या कुटुंबीयांना बहिष्कृत करून हाल हाल केले; त्याच विकृत परंपरेतील ही मंडळी असून त्यांना संतांनी सुरू केलेली समतेची,एकतेची वारी बंद करून जातीयवादी, धर्मांध लोकांच्या झुंडीने भरलेली, हातात शस्त्र धारण केलेली धारकऱ्यांची द्वेषयुक्त वारी सुरू करायची आहे.त्यामुळे ते समतेचा संदेश देणाऱ्या लोकांना नक्षलवादी ठरवून वारकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहे.

देवाला न मानणारे लोक वारीत घुसले म्हणून त्यांना अटक केली पाहिजे असे वकील असलेल्या आमदार मनीषा कायंदे म्हणतात.मनीषा ताईंना आमच्या संतांनी सांगितलेले विचार तरी माहित आहे काय ? त्यांनी संतांचे साहित्य वाचले तरी आहे काय ? आमच्या वारकरी संतांनी रंजल्या गांजल्या गोरगरीब लोकांची सेवा करण्यामध्येच खरा देव पाहिला होता.म्हणूनच संत तुकोबा म्हणतात, देव आहे ऐसी वदवावी वाणी ! नाही ऐसा मनी अनुभवावा !! हे अस्सल पुरोगामी संत विचार कायंदे आणि त्यांच्या जात्यांध समर्थकांना माहित आहे काय ? संत नामदेव,संत ज्ञानेश्वर,संत तुकोबा,संत एकनाथ,संत चोखामेळा यासारख्या संतांना त्रास कोणी दिला होता ? आणि आजही मनोहर भिडे संत तुकोबापेक्षा मनु श्रेष्ठ आहे असे जेव्हा म्हणतो, तेव्हा मनीषा कायंदे तोंडाला कुलूप लावून का बसतात ? या लोकांना संतांनी सांगितलेली समता,मानवता नको असून त्यांना मनुस्मृति मधील वर्णवर्चस्ववादी परंपरा या देशात पुन्हा लागू करायची आहे.म्हणूनच शेकडो वर्षाची वारीची सुंदर परंपरा ते दूषित करीत असून त्या ठिकाणी पूर्णपणे धर्मांध,विषारी, हिंसक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न मागील काही वर्षापासून काही मनुवादी कीर्तनकार,प्रवचनकार,बुवा आणि भिडे सारखे बहुजनांचे शत्रू असलेल्या लोकांकडून सुरू आहे. त्यामुळे खरे नक्षलवादी कोण आहेत हे आता वारकऱ्यांनीच ठरविले पाहिजे.

आमच्या संतांनी सुरू केलेली वारीची परंपरा हीच मुळात प्रबोधनासाठी सुरू केलेली आहे.पंढरपुरात जमणारा वैष्णवांचा मेळा हा लोकांच्या प्रबोधनासाठीच पूर्वीपासून सुरू झालेला आहे.परंतु आता या मेळ्यात वारी आणि संतांच्या मानवतावादी विचारांचा कवडीचाही संबंध नसलेले नालायक ढोंगी लोक घुसलेले असल्यामुळे वारीतील लोकांचे प्रबोधन करणे आता पूर्वीपेक्षाही जास्त महत्त्वाचे झालेले आहे.कारण या मनुवाद्यांनी वारीच्या परंपरेलाच चुकीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न चालवला आहे.त्यामुळे महाराष्ट्रात काम करणाऱ्या अनेक पुरोगामी संघटनांचे लोक वारीमध्ये जाऊन लोकांना जागृत करण्याचे काम करतात.त्यांना समता–वादी परिवर्तनवादी संत परंपरा समजावून सांगून त्यांच्या डोक्यातील अंधश्रद्धा, कर्मकांड,बुवाबाजी,घातक रूढी परंपरा दूर करण्याचा प्रयत्न करतात. संविधानातील न्याय,स्वातंत्र्य,समता, बंधुता याचे महत्त्व विशद करतात. पर्यावरणाचे महत्त्व सांगतात.सर्व जाती–धर्माच्या लोकांनी भेदाभेद न पाळता गुण्यागोविंदाने नांदावे असे आवाहन करतात.हीच गोष्ट वारीवर कब्जा करू पाहणाऱ्या मनुवादी धारकऱ्यांना नको आहे.म्हणून ते खऱ्या वारकऱ्यांना नक्षलवादी ठरवून त्यांची बदनामी करतात आणि वातावरण दूषित करतात.

आमदार मनीषा कायंदे यांनी महाराष्ट्रात येऊ घातलेल्या जनसुरक्षा कायद्याची धमकी देऊन महाराष्ट्राची खरी संत परंपरा पुढे नेणाऱ्या लोकांना अटक करण्याची धमकी देऊन एकप्रकारे फार चांगले काम केले असून कायदा येण्याच्या पूर्वीच हा कायदा कशासाठी व कोणासाठी येत आहे याची त्यांनी आम्हाला जाणीव करून दिली आहे.त्यामुळे आता तरी लोकांनी या कायद्याच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे आणि संविधान,लोकशाही,स्त्री पुरुष समानता यांच्या विरोधात असणाऱ्या धर्ममार्तंडांना त्यांची जागा दाखवली पाहिजे.खरा वारकरी हा कधीही जातीयवादी नसतो.अवघी एकाचीच वीण! तेथे कैसे भिन्नभिन्न !! भेदाभेद भ्रम ! अमंगळ !! हे समतावादी विचार मानणारा खरा वारकरी असतो.म्हणूनच एकमेकांमधील आदर,बंधूभाव,प्रेम टिकवून ठेवणारी आणि सामाजिक विषमता,जातीयवाद व अंधश्रद्धेवर प्रहार करणारी वारीची परंपरा टिकवून ठेवणे हे खऱ्या वारकऱ्याचे कर्तव्य आहे.तसेच मानवतावादी संत विचारांना उद्धवस्त करण्यासाठी वारीमध्ये जे धर्मांध धारकरी घुसले आहे तेच खरे नक्षलवादी असून त्यांना त्या वारीतून पहिल्यांदा हाकलले पाहिजे आणि आमची वारीची महान परंपरा शुद्ध आणि पवित्र केली पाहिजे.त्यासाठी महाराष्ट्रातील समतावादी संत परंपरेला मानणाऱ्या सर्व लोकांनी संघटित होऊन आवाज उठवण्याची गरज आहे.

जय हरी विठ्ठल

## मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची बाम्हणी येथे कृषिभेट




**गोंदिया–** पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्न हिराटोला येथील मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शुक्रवारी (दि.०४) आमगाव तालुक्यातील बाम्हणी गावातील शेतशिवाराला भेट दिली.

मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.सी. अवताडे, कार्यक्रम समन्वयक मिथून भगत,कार्यक्रम अधिकारी कमलेश चव्हाण, सहप्रमुख सुयोग उराडे यांचे मार्गदर्शनाखाली हिराटोला येथील मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी आमगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञान आणि जलव्यवस्थापन आदी विषयांवर शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन करीत आहेत.याचाच एक भाग म्हणून कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सृष्टी भदाडे, तेजस्विनी बिसेन, सुहानी भुस–ारी, विशाखा आंबेडारे, वैदवी भरणे यांनी बाम्हणी येथील शेतकरी कालिचरण भिमटे यांच्या शेतशिवारास भेट दिली. या भेटीत या विद्यार्थिनिंनी त्यांच्या शेतातील शेततळ्याची पाहणी केली. यावेळी श्री भिमटे यांनी विचारलेल्या प्रश्नांना या विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे देत त्यांचे शंका समाधान केले. याशिवाय यावेळी त्या विद्यार्थ्यांनी शेतीविषयक माहिती, पर्यावरणाचे महत्व, जैविक तंत्रज्ञान, शेतीचे आधुनिक प्रकार आदी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक,संत नामदेव



या बाबा नामदेवजींनी जी पंढरपूरच्या वाळवंटामध्ये, जी समतेची क्रांती घडवली सर्व जातींमधून संत घडवले. चोखामेळा त्याचं उत्तम उदाहरण. तसंच त्यांनी उत्तर भारतात गेल्यावरही तिथंही असे अठ्ठावीस संत ज्ञात आहेत.. एक ज्याला अंतःप्रवाह म्हणतात, under current म्हणतात, तसा समतेचा हा एक विचार सल–गपणानं भारतात आलेला आहे आणि तो अगदी महावीर–बुद्ध यांच्यापासून आलेला, तो पुढे सर्वांवर प्रभाव गाजवत राहिलेला आहे. तसे एकमेकांच्यामध्ये हे प्रभाव देवाणघेवाणींच्या स्वरूपात आलेले असू शकतात.

वेगवेगळ्या काळामध्ये निर्माण झालेली ही माणसं आपापल्या पद्धतीनं समाजाचं निरीक्षण करत होती. त्या समाजात जातिव्यवस्थेमुळं, वर्णव्यवस्थेमुळं, विषमतेमुळं निर्माण होणारी दुःखं, भेदभाव आणि माणसाला माणूस म्हणून न वागविण्याची वृत्ती हे सगळं पाहिल्यानंतर संवेदनशील मनाच्या माणसाला हे बदललं पाहिजे असं वाटणं हे स्वाभाविक होतं आणि त्याप्रमाणं नामदेवांनी फार मोठं कार्य केलं, असं मला वाटतं. म्हणजे पंजाबमध्ये जाऊन त्यांनी काय काम केलं मी त्याविषयी थोडं बोलतो, पण त्या अगोदर एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट मी नोंदवू इच्छितो. ती म्हणजे, नामदेवांच्याच काळात संत चोखोबा हे मंगळवेढ्याला होते. तिथं त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या अस्थी आणून पंढरपुरातील विठ्ठलाच्या मंदिरापुढं चोखोबांची समाधी बांधणं हे तेराव्या शतकातलं शब्दातीत अशाप्रकारचं धैर्य आहे. आजदेखील अशाप्रकारच्या घटना घडवणं हे अवघड व्हावं अशी आता आपल्या समाजाची अवस्था झालेली आहे आणि त्याकाळात तर अस्पृश्यता चरणसीमेला होती. स्वतः चोखोबांना त्या अस्पृश्येतेचा खूप त्रास झालेला होता. त्याच चोखोबांची समाधी, म्हणजे विठ्ठलाला भेटायला जाताना चोखोबांच्या समाधीला वंदन केल्याशिवाय माणसं आत जात नाहीत. म्हणजे, आईला भेटायला जाताना मुलाला आधी जवळ करावं, त्याच्यापुढं नतमस्तक व्हावं. कारण तुम्ही विठाई म्हणताय. विठ्ठलाचं वैशिष्ट्ये असं आहे विठुमाउली–विठाई, म्हणजे विठ्ठल शब्द पुरुषवाचक असून, पुल्लिंगी असून त्याला माउली म्हटलेलं आहे.

मातृहृदयामध्ये एक करुणा असते आणि या विठ्ठलामध्ये ही सर्वव्यापक, सर्वसमावेशक अशाप्रकारची करुणा असल्याचं आपल्याला दिसतं. आणि इथं नामदेवाचं.. नामदेवाचं हे जे कार्य आहे, त्याच्यापुढं हजारदा काय, लाखदा नतमस्तक झालं पाहिजे, असं मला वाटतं. चोखामेळा यांची समाधी विठ्ठल मंदिरापुढं बांधणं आणि तिही तेराव्या शतकात. मग नामदेवांची इतर अनेक कामं आ–हेत. म्हणजे त्यांची दासी असलेली जनाबाई अभंग लिहिते. प्रसंगी विठ्ठलाला प्रेमापोटी, मायेपोटी, आपलेपणापोटी शिविगाळ केल्याप्रमाणं, पण हट्ट धरून आईनं अनब मुलानं एकमेकांच्याशी जसं वागावं, तसं हे विठ्ठल आणि जनाबाई यांचं नातं, किंवा तेराव्या शतकात जनाबाईसारखी एक दासी, म्हणजे ती स्त्री आहे आणि पुन्हा दासी आहे ती. आणि ती याप्रकारचे अभंग लिहिते आहे.

हा समतेचा प्रवाह नामदेवांच्या वातावरणामध्ये.. नामदेवांनी स्वातंत्र्य दिल्याशिवाय, नामदेवांनी तिला जर गुलामगिरीत ठेवलं असतं, बोलायचं नाही, तू शब्द काढायचे नाहीस, तुझा हा अधिकार नाही, स्त्रीला ही अक्कल नसते. असं जर केलं असतं तर जनाबाई हे सगळं करू शकल्या नसत्या. तेव्हा त्यात नामदेवांचं हे मोठेपण आहे. आणि जनाबाईनीपण ते आत्मसात केलं आणि आत्माविश्कारातनं केलं आणि ते इतक्या उत्कटपणानं केलं की महाराष्ट्र आजही त्या अभंगांना विसरू शकत नाही अशी स्थिती आहे.? आणि मग नामदेवांचा प्रभाव किती मोठा असेल ते आपल्याला जाणवतं.? तो काळ आपण जर बघितला, तर प्रवासाची साधनं, वाहतुकीची साधनं ही इतकी दुर्मीळ त्या काळामध्ये आणि महाराष्ट्र ते पंजाब हे अंतर त्या काळाच्या मानानं केवढं प्रचंड. आजदेखील पंजाबला जायचं झालं.. आपण रेल्वे किंवा विमानानं जायचं झालं, तर फार सहज रीतीनं चटकन पोहचू शकत नाही. त्या काळात ते तिथपर्यंत पोहचले कसे? आणि मग मोठेपण असं, की गुरुनानक देवांनी समतेच्या प्रवाहाचा विचार घेऊनच शीख धर्माची स्थापना केली.

दहा मानवी गुरू झाले, शीख धर्मामध्ये. त्यातले गुरू गोविंदसिंग हे दहावे आणि ते अखेरचे मानवी गुरू मानले गेले. त्यानंतर गुरू ग्रंथ साहीब म्हणून जो एक ग्रंथ तयार करण्यात आला, तो गुरू. आज अमृतसरला आपण सुवर्ण मंदिरात गेलो, तर तिथं गुरू ग्रंथ साहीब हा ग्रंथच गुरू म्हणून ठेवलेला आहे आणि तिथंच उपासना केली जाते. ग्रंथ हाच गुरू आणि त्या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातून गेलेल्या नामदेवांचे साठ–बासष्ट अभंग समाविष्ट व्हावेत. हा केवढा चमत्कार वाटावा, विश्वास बसू नये असं काही घडलं असेल. कारण भाषा वेगळी, अंतर इतकं मोठं, इथून गेलेला माणूस, त्याचा प्रभाव तिथं निर्माण व्हावा आणि त्याचे इतके अभंग त्या ग्रंथामध्ये नोंदवले जावेत आणि आज शीख धर्माचे लोक नामदेवांना अत्यंत आदरानं, अत्यंत श्रद्धेनं मानतात हे जर पाहिलं तर नामदेवांचं मोठेपण.. म्हणजे एकीकडे चोखोबांची समाधी, एकीकडं महाराष्ट्रातले, तुम्ही उल्लेख केला त्याप्रमाणं अनेक संतांचा गोतावळा एकत्र जमवणं आणि जनाबाईंना स्वातंत्र्य देणं आणि पंजाबपर्यंत पोहचून हा एवढा प्रभाव तिथं निर्माण करणं हे सगळं बघितलं तर नामदेव हे वारकरी संप्रदायाचे एकप्रकारे प्रवर्तक आहेत, असं मानता येतं.

'ज्ञानदेवे रचिला पाया' असं म्हटलं गेलेलं आहे. परंतु असं जरी म्हटलं गेलेलं असलं, ज्ञानेश्वरांविषयीच्या आदरापोटी ते म्हटलं गेलेलं आहे. पण वारकरी संप्रदायाच्या दृष्टीनं विचार करायचा झाला तर नामदेव हे ज्ञानेश्वरांच्या पेक्षा थोडेसे ज्येष्ठही असे आहेत. आणि सगळं काम आहे. खूप त्यांचं वेगळ्या प्रकारचं आहे. यात ज्ञानेश्वरांना काहीही कमीपणा येत नाही. यामध्ये ज्ञानेश्वरांचं योग्य ते महत्त्व मान्य करून नामदेवांचं योग्य ते स्थान दिलं पाहिजे. आणि महाराष्ट्रानं नामदेवांची कदर केली नाही.

या नामदेवांच्या बाबतीमध्ये, नामदेवांना कमीपणा आणण्यासाठी नामदेव म्हणजे कच्चं मडकं अशा कथा रचण्यात आल्या. या जाणीवपूर्वक रचण्यात आलेल्या आहेत. त्याच्या पाठीमागं एक मानसशास्त्र आणि एक हितसंबंध आहेत. किंवा एखाद्या मंदिराच्या पुढं ते कीर्तन करीत असताना तू शूद्र असल्यामुळं तुला मंदिराच्या पुढं कीर्तन करता येणार नाही. मागं जाऊन तू कीर्तन कर म्हणून त्यांना तिथनं हाकलून देणं हे जे आहे. पण त्यावर वारकरी संप्रदायानंही एक उपाय काढला आणि तो असा, की मग ईश्वरालाच वाटलं की, हा खरा माझा सच्चा भक्त आहे. तर माझं तोंड त्याच्याकडं असलं पाहिजे आणि ते मंदिर तोंड फिरवून जिथं नामदेव कीर्तन करत होते तिकडं.. ही मिथकं आहेत. पण या मिथकातून एक अर्थ आपल्याला शोधता येतो सामाजिक अंगानं.

**– डॉ. आ. ह. साळुंखे**

# रब्बीतील धान खरेदीला उद्दिष्टवाढीसह मुदतवाढ



**गोंदिया :** – रब्बी हंगामातील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देत धान खरेदीला २० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने सोमवारी (दि.७) काढले. यामुळे जिल्ह्यातील ३५ हजारांवर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. रब्बी हंगामातील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी आमदार विन–ोद अग्रवाल, राजकुमार बडोले, विजय रहांगडाले यांनी मुख्यमंत्री व अन्न नागरी पुरवठा मंत्र्यांकडे हा विषय सातत्याने लावून धरला होता. या सर्वांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले.

शासनाने यंदा जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला रब्बी हंगामात ११ लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट दिले होते. तसेच धान खरेदीची मुदत ३० जूनपर्यंत होती. मात्र, मार्केटिंग फेडरेशनला दिलेले धान खरेदीचे उद्दिष्ट १७जूनलाच पूर्ण झाल्याने फेडरेशनने १८ जूनपासून धान खरेदी बंद केली. परिणामी धान विक्रीसाठी शासनाच्या एनईएमएल पोर्टलवर नोंदणी केलेले ३५ हजारांवर शेतकरी धान विक्रीपासून वंचित राहिल्याने अडचणीत आले. तर बाजारपेठेतही धानाचे दर कोसळले असल्याने शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ७०० रुपयांचे नुकसान सहन करावे लागत होते. तर धान विक्रीअभावी शेतकऱ्यांचा खरीप हंगामदेखील संकटात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली होती.

जिल्हा मार्केटिंग फेडरेशननेसुध्दा धान खरेदीचे उद्दिष्ट १५ लाख क्विंटलने वाढवून देण्याची मागणी केली होती. पण त्याला शासनाकडून प्रतिसाद मिळाला नव्हता. यानंतर जिल्ह्यातील आमदार विनोद अग्रवाल, राजकुमार बडोले, विजय रहांगडाले, संजय पूराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांची भेट घेऊन रब्बीतील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर तीन दिवसांपूर्वीच मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान या आमदारांनी पुन्हा मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन हा विषय ला–वून धरला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी उद्दिष्ट वाढवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्याचीच पूर्तता त्यांनी सोमवारी (दि.७) या संबंधीचे आदेश काढत केली.

अन्न व नागरी पुरवठा विभागाने काढलेल्या आदेशात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला १६ लाख ५० हजार क्विंटल, तर आदिवासी विकास महामंडळाला ३ लाख ५० हजार क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून दिले आहे. धान खरेदी करण्यासाठी २० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# मनसे व शिवसेना (उबाठा) ने हिंदी भाषा सक्तीचा शासन निर्णय रद्द केल्याबद्दल केला आनंदोस्तव

**गोंदियाः–** राज्यसरकारने लागू केलेला पहिलापासूनचा हिंदी भाषा सक्तीचा शासन निर्णय रद्द केल्याने मराठी भाषेचा विजय मनसेचा व शिवसेना (उबाठा)चा कार्यकर्त्यांनी मनोहर चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसमोर एकत्र येत मिठाई वाटून आनंदोस्तव साजरा केला.इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता, सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले.



एकीकडे नुकतंच मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा देण्यात आला, आणि त्या पाठोपाठ काही प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या हिंदी ची सक्ती करणे म्हणजे भाषेचे महत्व कमी करण्याच्या प्रयत्न सरकारचा चालला होता. याचा प्रखर विरोध करीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आवाज उठवला, तसा पाठपुरावा सरकारकडे करण्यात आला.यावेळी मोर्चा काढण्याचे ठरविल्यानंतर अनेक राजकीय पक्ष संघटनांनी याला पाठिंबा देत मोर्चात सहभागी होण्याची तयारी दाखवली.

सरकारने याच मोर्चाचा धसका घेत हिंदी भाषा सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द केले.यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आणि शिवसेना उबाठा तर्फे मराठी जनतेचे अभिनंदन करण्यात आले. मराठीचा विजय झाल्याचा जल्लोष मनसे तर्फे मनोहर चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच फटाक्यांची आतिषबाजी व मिठाई वाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी तालुका अध्यक्ष सुरेश ठाकरे, गोंदिया शहर अध्यक्ष सुरेश (नानु) चौधरी, शिवसेना(उबाठा) शहर प्रमुख राजेश कनोजिया, मनसेचे माजी शहर संघठक क्षितिज वैद्य, शहर उपाध्यक्ष सुमित कावळे, शहर उपाध्यक्ष डिलेश उईके, शहर सचिव माधव बनकर, शाखा अध्यक्ष कार्तिक राऊत, विशाल ढेबे व तसेच शिवसेनेचे युवासेना उपजिल्हाधिकारी विक्की बोमचरे, शहराधिकारी शुभम सहारे, संघटक मुकेश दहीकर, अशोक लंजे, संतोष सहारे प्रामुख्याने मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक व शिवसैनिक उपस्थित होते.

# सतीप्रथा-ब्राह्मणी वर्चस्वाचे मुख्य अस्त्र

भारतीय महिलांचं शोषण करणारी विचारधारा कशी जन्माला आली? ब्राह्मणी विचारसरणीतून स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काय केलं? वाचा ब्राह्मणीविचारसरणीवर ताशेरे ओढणारा सतीच्या चालीचे समर्थन करणारे अनेक विद्वान भारतीय पुरोहितवर्गात जन्माला आले आहेत. परंतु सतीची चाल बेंटिंगच्या कायद्याने बंद झाली तरी बालविवाह, केशवपन व सक्तीचे वैधव्य यांचा पुरस्कार विसाव्या शतकापर्यंत होत होता!

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी एका प्रख्यात विद्यालयाच्या प्राचार्यांनी लिहिलेल्या महिंदू धर्म आणि सुधारणाफ या ग्रंथाचा हव–ाला देऊन डॉ. सुमंत मुरंजन यांनी सक्तीच्या वैधव्याच्या व पुनर्विवाहाच्या बंदीमागील समाजशास्त्र स्पष्ट केले आहे. ङ्गब्राह्मण कुटुंबात बाळंतपण, विटाळ इत्यादी प्रसंगी शिवाशिवीच्या निर्बंधामुळे इतर जातीस मज्जाव असतो. या परिस्थिती यो–गक्षेमसातत्य राखण्याकरता ब्राह्मण स्त्रियांचीच जरूर पडते. म्हणून सक्तीचे वैधव्य ही कुटुंबधारणेचीच संस्था आहेङ्घ असे दाखवले आहे. १९०१ च्या खानेसुमारीनुसार एकट्या महाराष्ट्रात ब्राह्मण जातीत पाच वर्षे वयाच्या आतील साडेपंधरा हजार विधवा होत्या. पंधरा वर्षांच्या आतील सव्वातीन लाख व तीस वर्षांच्या आतील साडेपंचवीस लाख होत्या, अशी डॉ. मुरंजन आकडेवारी देतात, यावरून ब्राह्मण कुटुंबाची ही मकुटुंबधारणाफ किती मोठ्या प्रमाणावर चालली होती. याची यावरून आपल्याला कल्पना येते.

स्त्रियांच्या संबंधीच्या सती, बालविवाह व सक्तीचे वैधव्य यांमागे जसे समाजशास्त्र होते, तसेच राज्यशास्त्र व अर्थशास्त्रही होते. ज्या रामदेवरायांच्या साम्राज्याचा ज्ञानेश्वरीत गौरवपूर्ण उल्लेख आहे. त्याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी आणि चक्रधरांची शिष्या कामाईराणी हीस शंकरदेवाने बळजबरीने सती दिले आणि राजगादी निर्धीक केली. परंतु तिने सती जाताना मतुझे चामुडे कवणाचेनि हाती सौलवेल: आज निसंतान होवोनि यादववंशीय राजछत्राचाही अल्पावकाशचि निःपातु होईल गाफ असा शाप देऊनच तो चितेवर चढली! आणखी वाचा–अन्न सुरक्षा केवळ पोटासाठी नव्हे, तर शाश्वत जीवनासाठी आ–पणास अनुकूल असणारा राजाच गादीवर असावा म्हणून बाळाजी बाजीराव या तिसऱ्या पेशव्याने शाहू राजाच्या पंचावन्न वर्षांच्या वयोवृद्ध सकवारबाई या राणीवर दडपण आणून तिला सती जाणे भाग पाडले. त्याचप्रमाणे थोरल्या माधवरावाने मृत्युशय्येवर असतानाच रमाबाईला सती जाण्याचा उपदेश केला. या देशातल्या अश्राप आणि मायेचा झरा असणाऱ्या स्त्रीवर्गाची केलेली विटंबना आणि त्या सतींनी दिलेले शाप हेच हिंदू संस्कृतीस मारक ठरले.

या हिंदू संस्कृतीच्या अध: पतनाला मातृत्वाचा गौरव करणारे संस्कृत वाययही वाचवू शकले नाही. कारण त्यांनी मातृत्वाचा उदोउदो केला आणि पत्नीला जिवंत जाळले! माता हीसुद्धा अखेर पत्नीच असते. याचे भान द्रव्यलोभाने बेफाम झालेल्या ब्राह्मण पुरोहितास राहिले नाही. सतीच्या चालीमागचे अर्थशास्त्र हे ब्राह्मणी संस्कृती किती पराकोटीची नीच होती. याचे स्पष्ट उदाहरण आहे. सती जाणाऱ्या विधवेने आपल्या तोंडात एक मोती व वस्त्राच्या टोकाला बांधलेली पाच रत्ने घेऊनच सती जावे, असे उत्तर नारायणभट्टी व अन्तेष्टी बजावते. पुढे तर सती जाताना सर्वांगावर अवश्य तेवढे दागिने घालूनच नवऱ्याच्या सरणावर पाऊल ठेवावे, अशी प्रथा पाडली गेली. सती जळाल्यानंतर राखेत पडलेली कर्णभूषणे, बांगड्या, अंगठ्या वगैरे दागिने गोळा करण्याचा अधिकार ब्राह्मणांनाच दिला गेला. त्यामुळे विधिपूर्वक सती ही पुरोहित ब्राह्मणांची सुवर्णसंधीच होती. ही आर्थिक प्राप्ती होण्यासाठी त्यांनी सतीची चाल समाजात अधिक प्रतिष्ठित केली. पातिव्रत्यावर प्रव–चने झोडली. सतींची संख्या वाढावी म्हणून बालविवाहाला प्रोत्साहन दिले. लग्न न होताच एखादा माणूस मरणे, हे अशुभ ठरवले. आणि म चक्रात सारा हिंदू समाज रसा–तळाला गेला.

लोकमान्य टिळकांसारख्या महान पुढाऱ्याने 'संमती वया'ला विरोध करून हीच परंपरा पुढे चालवली. गोळवलकर म्हणतात त्याप्रमाणे सारे ब्रिटिश राज्यकर्ते केवळ ते परकीय आहेत म्हणून त्यांना राष्ट्रविरोधी मानायचे काय? लॉर्ड बेटिंगला भारताल्या स्त्रियांनी कोणत्या तोंडाने शत्रू मानावे? भारताच्या संदर्भात शत्रू–मित्रत्वाच्या कसोट्या लावायला ब्राह्मणवर्गाने कोणताच वाव ठेवलेला नाही. स्त्रियांच्या या विटंबनेविरुद्ध भारतात आवाज उठलाच नाही असे नाही. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ वराहमिहीर यांनी या प्रथांचा निषेध केला. अलीकडच्या काळात राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतिराव फुले, आगरकर, न्या. रानडे, डॉ. आंबेडकर यांनी हिंदू संस्कृतीतील या रूढीविरुद्ध बंड केले. म्हणून तर आजची स्त्री मुक्त झाली. या ऐतिहासिक पुरुषांबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका कोणती आहे? आपल्या देशात स्वमताचे मंडन किंवा इतरांच्या मतांचे खंडन करतानाही परस्परांची डोकी फोडल्याचे एकही उदाहरण आपल्या इतिहासात नाही. (पृ. ९१) म्हणून आपला इतिहास इतर देशांच्या मानाने श्रेष्ठ आणि गौरवशाली आहे, असे गोळवलकर म्हणतात, हे खरे आहे काय? आपल्या अनेक विचारवंतांमध्येही हा गैरसमज आहे. आपल्या देशाचा इतिहास इतर कुठल्याही देशापेक्षा फारसा वेगळा नाही. असण्याचे कारण नाही. मानवी इतिहासाच्या क्रमानेच तो विकसित होणार होत आहे. फारच झाले तर त्यात प्रमाणांचा फरक असेल; प्रकारांचा फरक असणे केवळ असंभवनीय आहे.

बृहद्रथ राजा बौद्ध मताचा चाहता होता, म्हणून पुष्यमित्र शुंगाने त्याचा खून केला नाही काय? प्रख्यात सम्राट शिलाजित ऊर्फ हर्ष या सर्वपंथसहिष्णू परंतु बौद्ध मताचा पुरस्कार करणाऱ्या राजाच्या खुनाचा कट पाचशे ब्राह्मणांनी केल्याने युआॅन च्वाँगने जे लिहून ठेवले आहे ते खोटे आहे काय? कर्मकांडाचा महाराष्ट्रातील शिरोमणी ब्राह्मण पंडित हेमाद्री याने कर्मकांडाला विरोध करणाऱ्या व समतेचा पुरस्कार करणाऱ्या महानुभाव पंथाचा प्रवर्तक श्रीचक्रधर यांचा केवळ हेमाद्रीची बायको निरुपणास हजर राहिली म्हणून प्राण घेतला व यादवराजाने त्याचा प्राण घेतला असे उठवले. हा लोकापवाद खोटा आहे काय? गोळवलकरांना अगदीच डोके फोडल्याचे उदाहरण हवे असेल तर तेही त्यांच्या भारताच्या इतिहासात आहेच. रामानुजाचार्य हे विशिष्टद्वैतवादी संप्रदायाचे संस्थापक आहेत. त्या वेळच्या कुलोच्युंग नावाच्या राजाला रामानुजांचा हा प्रयत्न आवडला नाही. त्याने रामानुजांचा मित्र कुरतालवार याचे डोके फोडले. याचा सूड म्हणून रामानुजाचार्य ज्या वेळी म्हैसूर राज्यात गेले. त्या वेळी तिथल्या बिट्टीदेव (विष्णुवर्धन) राजाला आ–पला अनुयायी करून जैनांचा संहार करण्याचे काम त्यांनी मोठ्या शिताफीने चालवलेले होते. त्यांनी पुष्कळ जैनांची डोकी तेलाच्या घाण्यात घा–लून फोडवली, असे त्यांचे अनुयायी मोठ्या प्रौढीने सांगत आले आहेत. हे जैन विशिष्टद्वैतमताच्या विरोधी मत मांडीत होते म्हणूनच हे झाले ना? अगदी अलीकडे तर विरोधी मतांचा पुरस्कार करणाऱ्यांची जीवघेणी अवहेलना करण्याचे प्रकार रूढ झालेले दिसतात.

आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांची मिरवणूक एकीकडून निघाली की दुसरीकडून चिपळणूकरांच्या अनुयायांनी गाढवाची मिरवणूक काढावी. आगरकर आपल्या मताच्या विरोधी मत प्रदर्शित करतात म्हणून त्यांची जिवंत प्रेतयात्रा काढावी. बुद्धिवादी म्हणवल्या जाणाऱ्या सावरकरांनी, आंबेडकरांनी बौद्ध धर्मात धर्मांतर करताच त्यांना मबाटगेफ म्हणावे आणि मधर्मांतर हाच राष्ट्रद्रोहफ अशी गर्जना करावी हे प्रकार अवलंबिले गेले. यावरून भारताचा इतिहास इतर देशांच्या तुलनेत कोणत्या अर्थाने गौरवास्पद आहे, हे हिंदुत्ववाद्यांनी एकदा स्पष्ट केले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राष्ट्रीय चळवळ आहे असे म्हणत असतानाच या संघटनेत स्त्रियांना मज्जाव का आहे, हे कोडे उमगत नाही.

आज भारतीय राजकारणात युवकांच्या अनेक संघटना आहेत. राष्ट्र सेवा दल, युवक क्रांती दल, यूथ फेडरेशन, अ. भा. विद्यार्थी परिषद वगैरे. परंतु यांपैकी एकाही संघटनेने स्त्रियांना मज्जाव केला नाही अथवा स्त्रियांच्या वेगळ्या संघटनांची आवश्यकता प्रतिपादन केलेली नाही. रा. स्व. संघाने स्त्रियांना मज्जाव करून त्यांच्या स्वतंत्र संघटनेचे प्रयत्न का केले? या प्रश्नाचे उत्तरही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रवक्त्याने दिले पाहिजे की, त्यांना हिंदू संस्कृतीतील स्त्रियांचे वेगळे अस्तित्व टिकवावयाचे आहे? स्त्री–पुरुष समानतेवर त्यांचा विश्वास नाही म्हणून की संघटन करण्याच्या दृष्टीने सोय म्हणून? त्याचबरोबर संयुक्त संघटन करताना स्त्रियांच्या नेमक्या कोणत्या अडचणी येतात, हेही त्यांनी एकदा स्पष्ट करावे. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भगव्या झेंड्याला अर्धी चड्डी घा–लून अर्धा सलाम (कदाचित हा यावनी शब्द खटकेलही) करणारे सर्वच स्वयंसेवक चातुर्वर्ण्याधिष्ठित विषम समाजव्यवस्थेचा आणि हिंदुधर्मप्रणीत स्त्रीदास्याचा पुरस्कार करणारे असावेत असे मी मानीत नाही. त्यांच्यापैकी बहुसंख्यांना त्यांचे वय लक्षात घेता केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रवादाचे आकर्षण असावे असे वाटते.

संघाचा राष्ट्रवाद हा पूर्ण हिंदू राष्ट्रवाद आहे आणि हिंदू राष्ट्रवाद हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा पुरस्कर्ता असल्याने ब्राह्मणवर्गवर्चस्वावर उभा आहे. तो राष्ट्रवाद नसून जातीयवाद आहे. हे ज्या वेळी त्यांच्या ध्यानात येईल. त्या वेळी त्यांच्या प्रतिक्रिया पाहण्यास व अभ्यासण्यात मला आनंद होईल. म्हणून या इतिहासाची प्रत्येक शाखेवर चर्चा करण्याची तयारी संघाने दर्शविली पाहिजे.

**– रावसाहेब कसबे (झोत)**

# पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणाऱ्यांना बोनस कधी

## निधीअभावी ५८०२२ शेतकरी बोनसच्या प्रतिक्षेत,११५० शेतकऱ्यांचे बोनस तृट्यामुळे अडकले

**गोंदिया :–**धान उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगामातील उत्पादित मालावर हिवाळी अधिवेशनात हेक्टरी २० हजार (अडीच हेक्टरच्या मर्यादित) बोनस जाहिर करण्यात आले. यासाठी स्थानिक जनप्रतिनिधींनी पाठपुरावा केला. त्यातच काही दिवसांपूर्वी गोंदिया जिल्ह्यातील १ लाख ३० हजार ४८८ शेतकऱ्यांसाठी लागणारा २४७ कोटी ११ लाख ४६ हजार रूपयाच्या निधीपैकी १८८ कोटी ६१ लाख रूपयाचा निधी देण्यात आला. प्राप्त झालेल्या निधीतून गोंदिया जिल्ह्यातील ७२ हजार ४६६ शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या अनुसंगाने कारवाई सुरू झाली. मात्र यातील ११५० शेतकऱ्यांच्या खात्यात अद्यापही काही वृट्यामुळे बोनस जमा झालेला नाही. तर दुसरीकडे ५८०२२ शेतकऱ्यांना अद्यापही बोनसची प्रतिक्षा आहे. विशेष म्हणजे, निधी अडकल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या मानसिकतेला घेवून शंकाकुशंका व्यक्त केली जात आहे.

शेती व्यवसातून शेतकरी दुरावू नये, यासाठी प्रोत्साहनपर निधी शासनाकडून देण्यात येत आहे. खरीप हंगामातील धानाला राज्य शासनाने हेक्टरी २० हजार रूपयाचे बोनस जाहिर केले. बोनसमुळे आर्थिक बळ मिळेल, अशी आशा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बाळगली होती. मात्र नविन खरीप हंगामाला सुरूवात होवूनही बोनस अदा करण्यात आले नव्हते. त्यातच काही दिवसापूर्वी राज्य शासनाने १८० कोटी ६१ लाख ५३ हजार ५८० रूपये प्रोत्साहनपर निधी म्हणून पणन विभागाकडे गोंदिया जिल्हयासाठी वळती केली. प्राप्त

झालेल्या निधीतून नोंदणीकृत १ लाख ३० हजार ४८८ शेतकऱ्यांपैकी ७३ हजार ६ १६ शेतकऱ्यांना बोनस अदा करण्याच्या अनुसंगाने यंत्रणेकडून प्रक्रिया सुरू करण्यात आली. यातील ७२ हजार ४६६ शेतकऱ्यांच्या खात्यात १५२ कोटी ७६ लाख ५८ हजार १८० रूपये बोनस वळते करण्यात आले. तर ११५० शेतकऱ्यांचे २७कोटी ८४ लाख ९५ हजार २०० रूपयाचा निधी बँक व काही



तांत्रिक नृत्यामुळे अद्यापही वळते करण्यात आले नाही. तर दुसरीकडे ५८ हजार ०२२ शेतकरी अद्यापही बोनसच्या प्रतिक्षेत आहेत.

शासनाच्या वतीने पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापही बोनसची रक्कम जमा करण्यात आली नाही. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम जमा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम केव्हा जमा करणार असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे.

राज्यातील महायुती सरकारने धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यत देण्याची घोषणा केली. बोनसचा लाभ शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना दिला जाणार होता. यासाठी जिल्ह्यातील १ लाख ३० हजारांवर शेतकऱ्यांनी नोंदणी केली. ज्या शेतकऱ्यांनी शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री केली त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम जमा करण्यात आली; पण पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम जमा करण्यात आली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**सध्या खरीप हंगामातील शेतीची कामे सुरु आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांना वेळोवेळी पैशांची गरज पडते. मात्र, शासनाने पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अद्यापही बोनसची रक्कम जमा केली नाही. परिणामी शेतकरी अडचणीत आले आहेत. शासनाने याची दखल घेऊन बोनसची रक्कम त्वरित जमा करावी.**

**सूरजलाल खोटेले, शेतकरी खातिया**

**पोर्टलवर आनलाइन केलेल्या शेतकऱ्यांना बोनस देऊ अशी घोषणा महायुती सरकारने केली होती, तसेच सर्वच शेतकरी बांधवांना एकाच टप्प्यात बोनसची रक्कम दिली जाईल असे सांगितले. मात्र, आता बोनससाठी निधी नसल्याने हजारो शेतकरी बांधव बोनसपासून वंचित आहेत. शासनाने बोनससाठी त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा.**

**वीरेंद्र मानकर, शेतकरी, बिरसी**


**राज्य सरकारने पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणाऱ्या सर्व शेतकरी बांधवांना लवकरात लवकर बोनस द्यावा, शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये, बोनस मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.**

**दिलीपसिंह जचपेले, शेतकरी, चिरामनटोला**

# भुयारी गटार योजनेच काम व नागरिकांच्या समस्यांची आमदाराकडून दखल

**तिरोडा :–** तिरोडा नगर परिषद हद्दीत भुयारी गटार योजनेचे काम सुरू आहे. परंतु, सदर योजना नागरिकांसाठी डोकेदुखी ठरली आहे. गटार योजनेच्या कामामुळे रस्त्याची दुर्दशा झाली आहे. यामुळे दररोज अपघात घडून येत असल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. या संदर्भात नगर परिषदेकडून तक्रारी करण्यात आल्या. अखेर याची आ. विजय रहांगडाले यांनी दखल घेत मुख्याधिकारी व कंत्राटदाराशी बैठक घेवून चांगलेच सुनावले. नागरिकांच्या समस्या व तक्रारीची दखल घ्यावी तसेच रस्ता दुरूस्तीला घेवून तातडीने उपाययोजना करण्यात यावे, अशा सुना दिल्या आहेत.

गटार योजनेच्या कामामुळे शहरात चांगलीच कोंडी निर्माण झाली आहे. रस्त्याचे खोदकाम करून थातूरमातूर लिपापोती केली जात आहे. यामुळे रस्त्यांवर मोठ्या



प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. ही समस्या नागरिकांसाठी मोठी डोकेदुखीची ठरली आहे. याबाबत नागरिकांनी नगर परिषदेला धारेवर धरत चांगलाच रोष व्यक्त केला. योजनेचे काम

आणि नागरिकांच्या तक्रारीवर आ. विजय रहांगडाले यांनी बैठक बोलाविली होती. या बैठकीत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मालकर तसेच कंत्राटदार उपस्थित होते. गटर योजनेमुळे निर्माण झालेल्या सम स्यांबाबत आमदारांनी नाराजी व्यक्त केली. अनेक रस्ते खोदले गेले असून योग्य दुरुस्ती न झाल्याने जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यावर आ. रहांगडाले यांनी चांगलेच सुनावले. स्पष्ट शब्दात कंत्राटदार व प्रशासनाला सूचना देत दर्जेदार आणि वेळेत काम पूर्ण झाले पाहिजे. आठवडाभरात रस्त्यांची योग्यरित्या डागडुजी करून उपाययोजना करावेत, अशा सुचना केल्यात. या समस्येवर लवकरात लवकर उपाययोजना करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी मालकर यांनी दिले.

# जगाला शांती, करुणा व अहिंसेची शिकवण देणारे शांतिदूत दलाई लामा



**अर्जुनी मोरगाव:–** जगातील समस्त मानवसमूहाला शांती, करुणा व अहिंसेचा उपदेश देणारे तिबेटियन धम्मगुरु दलाई लामा हेच खरे सत्य योद्धा आहेत. हिंसात्मक मार्गाला थारा न देता, स्वतःची धर्म संस्कृती कायम ठेवून अहिंसात्मक मार्गाने तिबेटियन बांधवांच्या अधिकारासाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. त्यांची करुणामय शिकवणूक हीच मानवाच्या कल्याणासाठी निश्चितच सार्थकी ठरणारी आहे. तिबेटियन बांधवांविषयी आम्हाला सहानुभूती आहे. सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवून शांती, करुणा व अहिंसेचा मूलमंत्र देणारे दलाई लामा शांतिदूत आहेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजीत नायर यांनी केले.

तालुक्यातील तिबेटियन वसाहतमधील तिबेट बांधवांच्या वतीने गोठणगाव स्थित संबोता तिबेटियन स्कूल येथे आयोजित तिबेटियन धम्मगुरू दलाई लामा यांच्या ९० व्या जन्मदिन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून परिविक्षाधीन आयएएस अधिकारी साई किरण, उपविभागीय अधिकारी वरुण शहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, तिबेट भारत मैत्री संघ भंडाराचे अमृत बनसोड, पोलिस उपनिरीक्षक घनश्याम रोहनकर, शुभम नवले उपस्थित होते. दलाई लामा यांच्या ९० व्या जन्मदिवसाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी नायर यांच्या हस्ते केक कापून जन्मदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## गडचिरोली, वडसा, आरमोरी तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा आढावा

**गडचिरोली:** जिल्ह्यात काल झालेल्या मुसळधार पावसासोबतच गोसेखुर्द धरणातून वैनगंगा नदीच्या पात्रात सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील विसर्गाच्या पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी नागरिकांना ‌घाबरू नका, पण सतर्क राहा‌ असे आवाहन करत नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेची उपाययोजना राबविण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला दिले आहेत.नदीकाठच्या गावांमधील संभाव्य धोका लक्षात घेऊन जिल्हाधिकारी पंडा यांनी देसाईगंज, आरमोरी व गडचिरोली तालुक्यातील परिस्थितीचा आढावा आज दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला. अप्पर जिल्हाधिकारी नितीन गावंडे, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सूर्यवंशी, रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) प्रसेनजीत प्रधाण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी निलेश तेलतुंबडे, तसेच सर्व तह–सीलदार, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

# ३ महिन्यांपासून सोनोग्राफी मशीन बंद



**गोंदिया:–** जिल्ह्यातील एकमेव महिला रुग्णालय जिल्हा मुख्यालयावर बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय आहे. या रुग्णालयात जिल्ह्यासह शेजारच्या मध्य प्रदेश, छत्तीसगड राज्यातूनही महिला उपचाराकरिता येतात. मात्र शस्त्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक असलेली सोनोग्राफी मशीन रेडिओलॉजिस्ट नसल्याच्या कारणावरून गत ३ महिन्यांपासून बंद असल्याची माहिती जिल्हा शक्यचिकित्सकांनी दिली.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने मात्र नियमित सोनोग्राफी केली जात असल्याचे सांगितल्यामुळे नेमका कोणता अधिकारी खरा बोलतो ? हा संशोधनाचा विषय आहे. बाई गंगाबाई महिला रुग्णालयामुळे गर्भवती महिलांना मोफत बाळंतपणाची सोय झाली. या रुग्णालयात छत्तीसगड, मध्य प्रदेशाच्या सीमावर्ती भागातून तसेच भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यातूनदेखील महिला येतात. मात्र हे रुग्णालय नेहमीच वादातीत ठरले आहे. या रुग्णालयात सोनोग्राफी मशीन आहे. ती मशीन कधी सुरू, तर कधी बंद असाच प्रकार नेहमी सुरू असतो.

आता गत तीन महिन्यांपासून रेडिओलॉजिस्ट नसल्याच्या कारणावरून बंद आहे. परिणामी रुग्णालयात येणाऱ्या महिलांना सोनोग्राफीसाठी खासगी सोनोग्राफी सेंटरमध्ये चाचणी करावी लागत आहे. बाळंतीण असलेल्या महिलांना सोनोग्राफीची नितांत आवश्यकता असते. मात्र मशीन बंद असल्याने महिला आणि त्यांच्या नातेवाइकांना आर्थिक ताण सहन करावा लाग आहे.

# सदस्यांनी केली ग्रामपंचायतची फसवणूक

## बोगस शिक्का व बनावटी प्रस्ताव केले तयार



**गोंदिया :–** गोरेगाव तालुक्यातील गट ग्रामपंचायत घोटी येथील दोन ग्रामपंचायत सदस्यांनी पैश्याचे देवाण–घेवाण करून बनावट ठराव, नाहरकत प्रमाणपत्र, बनावटी शिक्का व सहीचा वापर करून एका हॉटेल मालकाला दिले. या प्रकरणाचे बिंग फुटल्यानंतर ग्रामपंचायत सचिव यांनी गोरेगाव पोलिसात तक्रार दाखल केली आहे. नरेंद्र संपत रहांगडाले (४२) रा. घोटी, मनोज भागचंद बिसेन (३९) रा. अंबाटोली असे आरोपी ग्रा. पं. सदस्यांची नावे आहेत.

सविस्तर असे की, घोटी गट ग्रामपंचायत हद्दित एक हॉटेल गेस्ट हाऊस सुरु करण्यात आले. दरम्यान हॉटेल मालकाशी दोन ग्रामपंचायत सदस्यांनी संपर्क साधून नाहरकत प्रमाणपत्र मिळवून देण्याची हमी दिली.

ग्रामपंचायत प्रशासनाला या संदर्भात कसलीही माहिती न देता, आरोपी ग्रामपंचायत सदस्यांनी बनावटी शिल शिक्का, स्वाक्षरी करून ग्रामपंचायतीचे ठराव व नाहरकत प्रमाणपत्र दिले. या आधारावर घोटी येथे हॉटेलही सुरू झाली.

यावर काही सुज्ञ नागरिकांनी गावात हॉटेल मालका परवानगी कशी मिळाली, या संदर्भात विचारणा केली असता, त्याने ग्रामपंचायत प्रशासनाकडून नाहरकत प्रमाणपत्र व त्या बाबतचे ठराव घेण्यात आले असल्याचे सांगितले. तर दुसरीकडे या प्रकारातून अंनभिज्ञ असलेले ग्रा. पं. सरपंच व सचिवांनी या संदर्भात माहिती घेतली, असता, सदर हॉटेल मालकाला दिलेले नाहरकत प्रमाणपत्र व ठराव बनावटी असल्याचे समजून आले. या माध्यमातून आरोपी ग्राम पंचायत सदस्यांनी ग्रामपंचायतची फसवणूक केल्याचाही प्रकारही समोर आला.

यामुळे दोन्ही ग्रामपंचायत सदस्यांविरुद्ध गोरेगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे घोटी गावात एकच खळबळ उडाली आहे.

# वृक्षारोपण केल्यानंतर संवर्धन आवश्यक

**सालेकसा:–** झाडे ऑक्सिजन देतात, छाया देतात, पाणी साठवतात, जमिनीची धूप रोखतात आणि जैवविविधतेचा आधार असतात. परंतु ही सर्व देणगी टिकविण्यासाठी झाडांना आपली साथ हवी असते. जर आपण झाडे लावून ती जगविली, तरच आपल्या पुढच्या पिढ्यांना हिरवे वातावरण मिळेल. हे आपल्या गावाचे, शहराचे, देशाचे आणि पर्यायाने पृथ्वीचे भवितव्य आहे. म्हणूनच झाडे लावा आणि त्यांचे जबाबदारीने संवर्धन करा, असे प्रतिपादन जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले.

तालुक्यातील ग्रामपंचायत तिरखेडीअंतर्गत येणाऱ्या जोशीटोला येथे मएक पेड माँ के नाम २.० गटवृक्ष लागवड १५०१ केशर आंब्याच्या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धरती आबा वीर बिरसा मुंडा, कृषिरत्न वसंतराव नाईक यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन



मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तिरखेडी जि. प. क्षेत्राच्या सदस्या विमल कटरे तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर वासनिक, जि. प. सदस्या छाया नागपुरे, गटविकास अधिकारी संजय पुरी, सहाय्यक गटविकास अधिकारी के. एस. शेंदुरकर, पोलिस निरीक्षक भूषण बुराडे, पं. स. सदस्य रेखा फुंडे, विस्तार अधिकारी जी. जी. मुनिश्वर, सरपंच प्रीया शरणागत, ग्रामपंचायत अधिकारी कौशल्या मेश्राम, शिवाजी राठोड, रूपेश डहाटे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राजेश पटले, राग्रास्वअ तालुका व्यवस्थापक पवन पाथोडे, शालू साखरे, शंकरलाल नागपुरे, ग्रा. पं. सदस्य दिलीप बिसेन, मनीषा पाटले, अंजू उईके, बिरन हरीणखेडे, रेखा टेकाम, गजानन काटरे, कृष्णा पाटले, योगेश फुंडे, एस. जी. जाधव, मुख्याध्यापक मेश्राम, बृजलाल हरीणखेडे, हेमराज बोपचे, प्रदीप प्रदीप बिसेन यांच्यासह नागरिक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सरपंच प्रीया शरणागत यांनी तर संचालन डी. जी. ठाकरे यांनी केले. उपस्थितांचे आभार सामाजिक कार्यकर्ते मनोज शरणागत यांनी मानले.

# धावत्या दुचाकीवर झाड पडल्याने वडीलाचा मृत्यू तर मुलगा जखमी

**तिरोडा:–** तालुक्यातील सतोना बोपेसर मार्गावर सकाळी ७ जुर्ले रोजी सकाळच्या सुमारास झाडावर वीज पडल्याने धावक्या दुचाकीवर झाड पडल्याने दुचाकीवरील वडीलाचा मृत्यू तर मागे बसलेला शाळकरी मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.जीवचंद यादोराव बिसेन (४६) असे मृतकाचे तर चिराग जीवचंद बिसेन (१६) असे गंभीर जखमी मुलाचे नाव आहे.

जीवचंद बिसेन हे वडेगाव येथील रहिवासी असून मुलगा चिराग यास शाळेत सोडण्यासाठी दुचाकी क्रमांक एमएच ३५ एपी ९३७० ने तिरोडा कडे जात होते.यावेळी अचानक सातोना –बोपेसर गावाजवळ रस्त्याच्या कडेवरील करंजी या झाडावर वीज कोसळल्याने झाड रस्त्याववर धावत असलेल्या दुचाकीवर कोसळला.या झाडाखाली दबल्यो जीवचंद बिसेन यांचा जागीच मृत्यू झाला तर चिराग हा गंभीर जखमी झाला.जखमी मुलावर गोंदिया येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.





# खासदार धावले अपघातग्रस्तांच्या मदतीला

**गोरेगाव :–** शहरातील ठाणा मार्गावर एमसीपी शाळेजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन दुचाकीचालक व मागे बसलेल्या महिला जखमी झाल्या. ही घटना सोमवारी (दि. ७) दुपारी ३:३० वाजता घडली. या दरम्यान आमगाव दौऱ्यावर जात असलेले खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी त्यांचे वाहन थांबविले व ते अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावले.

खा. नामदेव किरसान हे सोमवारी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास गोरेगाव येथून ठाणामार्गे आमगाव तालुक्याच्या दौऱ्यावर



जात होते. याच दरम्यान ठाणा मार्गावरील एमसीपी शाळेसमोर दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने चारजण जखमी झाले. ही येताच ते अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून गेले.

खासदार किरसान यांच्यासह असलेल्या कर्मचाऱ्यांनी लगेच गोरेगाव रुग्णालयात फोन करून, रुग्णवाहिका मागवून अपघातग्रस्तांना रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांना फोन करून रुग्णांवर वेळीच उपचार करण्याच्या सूचना केल्या.यामुळे अपघातग्रस्तांचे प्राण वाचविणे शक्य झाले.

# क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य योजने अंतर्गत प्रस्ताव आमंत्रित

**गोंदिया :** राज्य शासनाच्या क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत,नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी तसेच खेळाडुंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे प्रशिक्षण वाढविण्यासाठी क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येते. गोंदिया जिल्ह्यासाठी या योजनेवर २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी पात्र संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अनिराम मरसकोले यांनी दिली. राज्य शासनाच्या संबंधित विभागाने दिलेल्या मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, तंत्रशिक्षण व वैद्यकिय महाविद्यालय, विविध खेळाच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदनी अधिनियम १८६० अन्वये पंजीबध्द व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना, युवा मंडळे, महिला मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद व आदिवासी विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या आश्रम शाळा तसेच राज्य शासनाच्या वतिने विकसीत करण्यात आलेली विभाग, जिल्हा, तालुका व ग्राम क्रीडा संकुले. सदर योजनेसाठी पात्र राहतील. सदर अनुदानासाठी संस्थेकडे स्वतःच्या मालकीची किंवा दिर्घ मुदतीच्या नोंदनीकृत करारावर जागा असणे आवश्यक आहे.

# पुल खचल्यानंतरच जाग येणार का?

**तिरोडा :–** तालुक्यातील बोरा–सोनेगाव पुलावरील मार्गाचे डांबरीकरण रस्त्याची दुर्दशा झाली आहे. निकृष्ट काम झाल्याने रस्त्यावर महिनाभरातच खड्डे निर्माण होणे सुरू झाले आहे. या संदर्भात नागरिक व प्रवाशांकडून लक्ष वेधण्यात आले. परंतु, विभागाकडून दुर्लक्ष करण्यात आले. आता पुलावरील रस्ता अधिकच धोकादायक स्थितीत जावू लागला आहे. असे असतानाही बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत असल्याने पुल कोसळल्यानंतरच दखल घेणार का? असा प्रश्न परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पावसामुळे रस्ता खचत असून पुलावरून प्रवास करताना भिती निर्माण होत आहे. यामुळे विभागाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्न निर्माण केले जात आहेत.

बोरा–सोनेगाव मार्गाचे





डांबरीकरण करण्यात आला. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. डांबरीकरणासाठी बांधकाम विभागाने जवळपास १८५ लक्ष रूपये खर्च केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे डांबरीकरण काम दर्जेदार होणे अपेक्षित होते. परंतु, काम करून महिना लोटला नाहीकी, रस्त्यावरील डांबर उखडून मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे निकृष्ट काम झाल्याचे दिसून येत आहेत.

पुलाजवळच डांबर खचून खड्डे तयार होत असल्याने मोठ्या अपघाताची शक्यताही वर्तविली जात होती. अशातच मागील दोन दिवसांपासून तालुक्यात पाऊस पडत आहे. या पावसामुळे सदर खड्डे आणखीच धोकादायक स्थितीला आले असून संपूर्ण रस्ताच पुलात सामावून जातो की जातो की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्ता खचत असल्याने पुलालाही धोका निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे. असे असतानाही बांधकाम विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे पुल कोसळल्यानंतर विभागाला जाग येणार का? असा प्रश्न संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

डांबरीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असूनही वरिष्ठ अधिकारीही गप्प असल्याने भ्रष्टाचाराच्या चर्चेलावाव मिळत आहे. याकडे आता जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रीत करून संबधित अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अशी मागणी बोरा वासीयांकडून केली जात आहे.

## पावसाने भ्रष्टचाराची पोलखोल

**बोरा–सोनेगाव मार्गावर असलेल्या कालव्यावर पुल आहे. यामुळे परिसरातील गावकऱ्यांचे आवागमन सुरळीत सुरू असते. त्यातच जवळपास १८५ लक्ष रूपये खर्चुन रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. मात्र महिनाभरातच डांबरीकरण रस्ता खड्डेमय झाला. यामुळे निकृष्ट साहित्याचा वापर करून डांबरीकरण करण्यात आल्याचा आरोप बोरासह परिसरातील गावकऱ्यांकडून केला जात होता. त्यातच मागील दोन दिवसांपासून पाऊस सुरू असल्याने रस्ता मोठ्या प्रमाणात खचत असून खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे पावसाने कंत्राटदाराचे पाप चव्हाट्यावर आणले असून भ्रष्टाचार झाल्याचे उघड केले आहे. विशेष म्हणजे, ही बाब जनप्रतिनिधी व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हात ओले असल्यानेच याकडे जाणून दुर्लक्ष केले जात आहे का? अशी शंका व्यक्त केली जात आहे.**

# एम.जी. पॅरामेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना डी.एम.एल.टी.परीक्षेमध्ये घवघवीत यश



**गोंदिया :–** महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबई, अंतर्गत घेण्यात येणाऱ्या डी.एम.एल.टी. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाच्या परिक्षेचा निकाल ०५ जुलै ला लागला असुन या मध्ये एम. जी. पॅरामेडिकल कॉलेज मुर्री चौकी, गोंदियाच्या ९८टक्के निकाल ला–गलेला आहे. एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या परिक्षे मध्ये सहभागी विद्यार्थ्यांपैकी कु. निकीता राणे या विद्यार्थीनीने ९०.२२टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावीला आहे.

कु. आचल येळे ८९.२२टक्के, कु. साक्षी गौतम ८८.४४टक्के, कु. अल्का भगत ८७.७८टक्के, कु. गीता गहाने ८६.३३ टक्के, गुण घेऊन यश संपादन केलेला आहे.

जिल्ह्यात पॅरामेडिकल क्षेत्रात अग्रणी असलेल्या एम.जी. पॅरामेडिकल कॉलेजला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबईची मान्यता असुन दरवर्षी अनेक विद्यार्थी शासकीय नौकरीसाठी निवडले जातात. विद्यार्थ्यांनी आपले यशाचे श्रेय कॉलेजचे संचालक अनील गोंडाणे व पालकांना दिले आहे.

या यशासाठी प्राचार्य अनुसया लिल्हारे, प्रा. प्रीती वैद्य, प्रा. रामेश्वरी पटले प्रा. छाया राणा, प्रा. आरती राऊत, प्रा. ललीतकुमार डबले, प्रा. मनीष चैधरी, प्रा. सौरभबघेले, प्रा. आकाश श्रोते, प्रा. सम्येक गणवीर, राजु रहांगडाले, राजा उंदिरवाडे, श्रीमती योगेश्वरी ठवरे, व श्रीमती रूपाली धमगाये यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली नवेगावबांध पर्यटन विकासाची पाहणी



**नवेगावबांध:-** येथील पर्यटन संकुल आणि संजय कुटी एमटीडीसी प्रकल्पाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन समितीचे अध्यक्ष प्रजीत नायर यांनी शुक्रवारी (दि. ४) दोन तासांचा विशेष दौरा करून सखोल पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण परिसरात पायी फिरून निसर्ग पायवाटांचा अनुभव घेतला. तसेच या परिसरातील नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद घेतला.

या दौऱ्यात अर्जुनी मोरगावचे उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, जलसंपदा विभागाचे समीर बनसोडे, मंडळ अधिकारी वाघदरे, ग्राम महसूल अधिकारी भगवान नंदागवळी, नवेगावबांध फाउंडेशनचे सचिव रामदास बोरकर, अध्यक्ष विजय डोये, वन्यजीव विभागाचे अधिकारी पारधी उपस्थित होते.

नवेगावबांध, इटियाडोह धरण आणि प्रतापगड या तीन प्रमुख पर्यटनस्थळांचा समावेश करून एकात्मिक विकास आराखडा (डीपीआर) तयार करण्यात आला तर महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळवून संपूर्ण परिसराचा पर्यटन विकास करता येईल. यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना विशेष पुढाकार घ्यावा असे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी सांगितले.

उपस्थित असलेले पर्यटन कार्यकर्ते सुनील तरोणे यांनी इको टुरिझम संदर्भात महत्त्वपूर्ण मत मांडले. लहान गोष्टींचा दर्जेदार विकास करून, योग्य देखभाल दुरुस्ती केल्यास संपूर्ण परिसर महिरवळफ होऊ शकतो आणि पर्यटकांना हव्या असलेल्या नैसर्गिक अनुभवांची पूर्तता होऊ शकते. गेल्या चार वर्षात नवेगावबांध पर्यटन संकुलाच्या छोट्या विकासकामांमुळे ४०० पेक्षा अधिक स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. भविष्यात ही संख्या १००० पेक्षा अधिक होईल, असा विश्वास सुनील तरोणे यांनी व्यक्त केला.

### या गोष्टींवर भर देण्याची गरज

**नवेगावबांध, इटियाडोह व प्रतापगड एकत्रित पर्यटन आराखड्याची संकल्पना**
**जलक्रीडा, पायवाट पर्यटन, पक्षीनिरीक्षण यांसारख्या साहस व निसर्ग पर्यटन संधी**
**स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी**
**पर्यावरणपूरक मइको-टुरिझमफला प्रोत्साहन**
**विशेष डीपीआर तयार करण्याचा निर्णय**

**नवेगावबांध पर्यटन स्थळाला नवीन दिशा देणारा हा दौरा स्थानिक विकास व रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. शासनाकडून मंजुरी मिळाल्यास संपूर्ण परिसर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र ठरेल, याकरिता स्थानिक पातळीवर आवश्यक असलेली मदत शासनाकडून केली जाईल.**
**प्रजित नायर, जिल्हाधिकारी, गोंदिया**

# शहराच्या सिटी सर्व्हेचे काम जलदगतीने पूर्ण करा



**गोंदिया :-** चार वर्षापूर्वी मंजूर झालेल्या नगर भूमापन (सिटी सर्व्हे) कामाच्या संथ गतीबाबत आ. विनोद अग्रवाल यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हे काम तातडीने पूर्ण करण्याचे कडक निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहे.

४ जुलै रोजी गोंदिया येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. सिटी सर्वे व शहरातील विविध समस्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीला उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, उपअधीक्षक भूमी अभिलेख अजय क्षीरसागर, अतिरिक्त तहसीलदार व मुख्याधिकारी श्रीकांत कांबळे, तहसीलदार समशेर पठाण,ऋषिकांत साहू, विवेक मिश्रा, जितेश टेंभरे, लिमेंद्र बिसेन, नुरुनाथ दिहारी, नगर रचना विभागाचे तुरकर, मेश्राम यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

आ. अग्रवाल यांनी सिटी सर्वेक्षणाच्या कामाचा आढावा घेतला. यात पुनर्मापन, ड्रोन सर्वेक्षण आणि स्पॉट सर्वे व गोंदिया शहरालगतच्या फुलचूर, कटंगी, कुडवा, मुर्री, पिंडकेपार, गोंदिया खुर्द आणि गोंदिया बुजुर्ग या सात गावांमधील कामाचा आढावा घेतला. सिटी सर्वे आणि पुनर्मोजणीचे काम संथ गतीने सुरू असल्याने यावर नाराजी व्यक्त केली. पथकांची संख्या वाढवून नकाशा अंतिम करण्याचे काम पूर्ण करण्यास सांगितले. तसेच दर आठवड्याला २०० मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यासह दर आठवड्याला कामाचा अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले.

### आठ दिवसात न. प.च्या दुकानांचा लिलाव

**नगर परिषदेने बांधलेल्या संकुलांमधील खोल्या आणि दुकाने भाड्याने न दिल्याबद्दल आ. अग्रवाल यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरपरिषद उत्पन्न आणि देखभालीकडे लक्ष देत नाही. दुकाने रिकामी पडून आहेत, पण ती भाड्याने का दिली जात नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यासंदर्भात ८ दिवसांत दुकाने भाड्याने देण्याची प्रक्रिया पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.**

### स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनावर भर

**शहरातील केरकचऱ्याची नियमित विल्हेवाट लावण्यात यावी, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे, बाजार परिसरातून कचरा संकलित करण्यासाठी १० नवीन घंटागाड्या खरेदी करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचेही निर्देश दिले.**

# तपासणीआड कृषी केंद्र व्यवसायीकांकडून वसुली

## प्रभारी कृषी विकास अधिकाऱ्याची सीईओंकडे तक्रार

**गोंदिया :-** कृषी सेवा केंद्राच्या तपासणीआड प्रभारी कृषी विकास अधिकाऱ्याने कृषी व्यवसायीकांकडून वसुलीचा प्रयत्न केल्याचा धक?कादायक प्रकार समोर आला आहे. व्यवसायीकांनी याप्रकरणी जिल्हा परिषद उपाध्यक्षांकडे व त्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करीत कारवाईचे निर्देश दिले आहे.

जिल्ह्यात खरिपाच्या तोंडावर खताची साठेबाजी होत असून, शेतकऱ्यांवर वाढीव दराने खत खरेदीची वेळ आली आहे. याविषयी शेतकऱ्यांनी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. त्याची दखल घेत जिल्हा परिषदेचे प्रभारी कृषी विकास अधिकारी प्रमोद कागदीमेश्राम यांना काही कृषी सेवा केंद्राची तपासणी करा, अशी सूचना केली. परंतु, नव्या शासन आदेशानुसार कृषी विकास अधिकाऱ्यांचे तपासणीचे अधिकार काढल्याचे सांगत हे काम करण्यास कागदीमेश्राम यांनी नकार दिला. मात्र, त्यानंतर काही वेळातच ते आमगाव येथील जय भवानी कृषी सेवा केंद्र व त्यानंतर कट्टीपार येथील कृषी सेवा केंद्राची तपासणी करून पैशाची मागणी करीत असल्याचे व्यवसायीकांनी भ्रमणध्वनीवरून जिल्हा परिषद उपाध्यक्ष हर्षे यांना कळिवले. त्यानंतर गोरेगाव तालुक्यातूनही कागदीमेश्राम यांनी पैशाची मागणी केल्याबाबत व्यवसायीकांनी माहिती दिली.

यावेळी भ्रमणध्वनीवरून कागदीमेश्राम यांच्याशी उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी संवाद साधला असता त्यांनी चूक झाल्याची कबुली दिली. मात्र, हर्षे यांनी ही बाब गांभीर्याने घेत थेट जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम यांना याबाबत माहिती देत कागदीमेश्राम यांच्यावर कारवाईची सूचना केली. आता त्यांच्यावर काय कारवाई होते.



**प्रभारी कृषी विकास अधिकारी कागदीमेश्राम हे तपासणीआड पैशाची मागणी करीत असल्याच्या अनेक तक्रारी कृषी व्यवसायीकांनी केल्या. त्यामुळे त्यांचा पदभार काढावा, अशी शिफारस सीईओंकडे केली आहे.**
**-सुरेश हर्षे,उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया**

# ॲड.लखनसिंह कटरे यांनी दिला ग्रा.पं.सदस्यत्वाचा राजीनामा



**गोंदिया:-** ग्रामविकासाची सर्वांगीण व शाश्वत अशी विकासाची संकल्पना जी संयुक्त राष्ट्राने प्रस्तावित केली आहे,ती संकल्पना आपल्या अडीच वर्षाच्या ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच पदावर राहून सरपंच व इतर सदस्यांच्या मनात उतरवण्याचे सातत्याने प्रयत्न करुनही त्यात असमर्थ ठरल्याने सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक एड.लखनसिंह कटरे यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्यत्वासह उपसरपंचपदाचा राजीनामा १ जुलै रोजी ग्रामपंचायत सरपंचाना सादर केला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील बोरकन्हार ग्रामपंचायत मधील वार्ड क्रं.३ मधून सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक राहिलेले ॲड.लखनसिंह कटरे यांनी निवडणूक लढली होती.निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर उपसरपंच पद ही मिळाले.आपण आपल्या गावाचा सर्वांगीण विकासाच्या ध्यास मनात घेत ग्रामपंचायततमधील प्रशासकीय कामकाजात विकासाचा दृष्टीकोन समोर ठेऊन पाऊल ठेवले होते.परंतु आपल्या अडीच वर्षाच्या काळात सरपंच व सदस्यांकडून त्याकरीता पाहिजे तसे सहकार्य न मिळाल्याने प्रशंसनीय व डोळ्यात भरण्यालायक असे कार्य आपणास करता आले नाही,ही बाब स्विकारत आपल्या ग्रामपंचायत सदस्यत्वासह उपसरपंच पदाचा राजीनामा एड.कटरे यांनी दिला.त्यांच्या या राजीनाम्याने ग्रामपंचायत प्रशासनात चांगले व्यक्ति जे शाश्वत विकासाची कास मनात घेऊन जाण्याची इच्छा ठेवतात अशा नागरिकांसमोर एक प्रश्न उभा ठाकला आहे.

### संपकाळातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

नागपूरः महावितरणच्या २३ पैकी ६ कर्मचारी संघटनांनी बुधवारी (दि. ९) एका दिवसाचा संप पुकारला आहे. या संपकाळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन पूर्ण झाले राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक व चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये.

# आमगाव तहसीलवर नागरिकांची धडक




**आमगावः-** महाराष्ट्र शासनाने गोंदिया जिल्ह्यातील आमगाव नगरपरिषदेचे विघटन करून आम गावला नगरपंचायत आणि रिसामा, कुंभारटोली, बिरसी, किडांगीपार, बनगाव, माल्ही, पदमपूर या सात गावांना ग्रामपंचायतीच्या दर्जा बहाल करण्यात यावा, याकरिता अधिसूचना काढली.

मात्र, या अधिसूचनेला ६ महिने लोटूनही अद्याप शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याने या ७ गावांतील त्रस्त झालेल्या शेकडो संख्येत येऊन नागरिकांनी निकेश बाबा मिश्रा व तिरथ येटरे यांच्या नेतृत्वात अमर वराडे, सौरभ रोकडे, राजकुमार पुराम, संपत सोनी, जगदीश चुटे, बालू वंजारी, देवकांत बेहेकार, इसलाल भालेकर,भुमेश शेंडे यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला.

या ७ गावात रस्ते बांधकामाचा प्रश्न, घरकूल आणि विविध समस्यांनी हे सात गावातील नागरिक त्रासलेले होते.परंतु, शासन या गावांना ग्रामपंचायतीच्या दर्जा देण्यासाठी दिरंगाई करत आहेत.असा आरोप करुन बनगाव,बिरसी,पदमपुर, किडंगीपार येथील नागरिकांनी धडक मोर्चा तहसील कार्यालयावर काढला. यावेळी राजेश अग्रवाल, मुनेश पंचेश्वर, घनश्याम रहांगडाले, पिंटू अग्रहरी, संगीता पाथोडे, सोनू महानंदी, अनिता ठाकरे तसेच पुरुष महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेजगाव ग्राम पंचायतीला आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देवून सन्मान



**गोंदिया:-** ग्रामपंचायतींचे प्रशासकीय कामकाज कार्यक्षम करण्यासाठी तसेच कार्यपद्धतीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ग्राम पंचायतींना आयएसओ मानांकन दिले जाते. यात सेजगाव ग्राम पंचायतीने बाजी मारली असून आयएसओ मानांकन प्राप्त केले आहे. नुकतेच प्रमाणपत्र देवून सेजगाव ग्राम पंचायतीचा सन्मान करण्यात आला.

केंद्र सरकारच्या सूचनांनुसार पंचायत राज संस्थांच्या कारभारात पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागाअंतर्गत आवश्यक असलेले दाखले मिळण्यासाठी ई-पंचायत प्रकल्प राबवण्यात येत आहे. ग्रामपंचायतींच्या कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.


ग्राम पंचायतींमधील कागदपत्रांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतींकडे वाटचाल सुरू आहे. यासाठी ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणीकरण करून घेतले जात आहे. आयएसओ मानांकन घेण्यासाठी कोणत्या कार्यपद्धतीचा वापर करावा याचे वेळापत्रक निश्चित करून देण्यात आले होते. त्यानुसार राज्य आणि जिल्हा पातळीवर समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींच्या कामकाजाचे मूल्यमापन करून त्यांना मानांकन देण्यात येणार आहे. यानुसार सेजगाव ग्राम पंचायतीने शासनाने दिलेल्या निकषानुसार कामगिरी करून उत्तम ठरली आहे.

वैयक्तिक-सार्वजनिक शौचालय सुविधा व वापर, पाणी गुणवत्ता तपासणी, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य व शिक्षण विषयक सुविधा, केंद्र वा राज्य पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी, बचतगट, प्लास्टिक वापर बंदी, ग्रामपंचायतीच्या घरपट्टी वा पाणीपट्टी वसुली आदिमध्येही सेजगाव ग्राम पंचायतीने दमदार कामगिरी करीत नाव लौकिक केले आहे.

या कामगिरीची दखल घेत सेजगाव ग्राम पंचायतीला आयएसओ मानांकन देण्यात आले आहे. नुकतेच सरपंच सौ.उषा कठाणे, उपसरपंच टेकचंदउ बिसेन यांनी आयएसओ प्रमाणपत्र स्विकारले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य टी.एल.पारधी, गौरीशंकर पारधी, ग्रा.पं.अधिकारी अतुल ठाकरे, भिकराम रहांगडाले, तथा कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेच्या शाळांत गुरुजींची पदे रिक्त

**गोंदिया :-** कमी पटसंख्या असलेल्या १८५ शाळांना कुलूप लावण्याचे संकेत शासनाच्या वतीने पाच वर्षांपूर्वी देण्यात आले होते. जिल्हा आदिवासी व नक्षलग्रस्त असून, या जिल्ह्यातील अनेक शाळा दुर्गम भागात आहेत.




या दुर्गम भागातील शाळा पटसंख्येअभावी बंद होण्याच्या मार्गावर होत्या. या शाळांना कुलूप लागण्याची भीती विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांनाही सतावत होती; परंतु आता या शाळा बंद होणार नाहीत, या शाळांचे समायोजन नजीकच्या शाळांत करण्याचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगनाथम यांनी १२ एप्रिल रोजी काढले आहे. कमी पटसंख्या असलेल्या जवळ-जवळच्या दोन-तीन शाळा एकत्र आणून समूह शाळा चालविण्याचा सरकारचा मानस असला तरी जिल्ह्यातील फक्त एकाच समूह शाळेचा प्रस्ताव शासनाला गेला आहे. कमी पटसंख्या असलेल्या शाळाही सुरूच राहतील, असे नियोजन प्राथमिक शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांनी केले आहे. त्यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील पालकांनी सुटकेचा निःश्वास घेतला आहे. जिल्हा परिषद, नगर परिषद, खासगी अनुदानित व स्वयंसहायता शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १८५ शाळा आहेत.

### जिल्ह्यात सहायक शिक्षकांची १९३ पदे रिक्त

**जिल्ह्यातील सहायक शिक्षकांची २७८९ पदे मंजूर असताना त्यातील २५२६ जागा भरल्या आहेत, तर १९३ जागा रिक्त आहेत. तसेच २७ सहायक शिक्षक अतिरिक्त आहेत.**
**जिल्ह्यातील पदवीधर शिक्षकांची ९४३ पदे मंजूर असताना त्यातील ७७३ जागा भरल्या आहेत, तर १८० जागा रिक्त आहेत. तसेच १३ पदवीधरांच्या १८० जागा रिक्त आहेत. तसेच १३ पदवीधर शिक्षक अतिरिक्त आहेत. २१० शाळांमध्ये महिला शिक्षकच कार्यरत नाही.**

### एकशिक्षकी ९७ शाळा

**खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा कुठेही मागे राहू नयेत, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात; पण मागील तीन-चार वर्षापासून जि.प. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.**

**जिल्ह्यातील ९७ शाळांमध्ये प्रत्येकी एकच शिक्षक कार्यरत असून, त्यांच्यावर चार वर्गाचा भार असल्याचे चित्र आहे.जिल्ह्यातील २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा असल्या तरी कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी जिल्ह्यातील कोणतीही शाळा बंद होणार नाही. मूलभूत शिक्षणाचा हक्क मुलांना देण्यास आम्ही तत्पर आहोत. कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील मुलांचे समायोजन नजीकच्या शाळेत करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय येणार नाही याची आम्ही काळजी घेतो.**
**सुधीर महामुनी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, गोंदिया**

# जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने ९ जुलै रोजी

**गोंदिया :-** सरकार स्थापण झाल्यावर सहा महिण्याचा कालावधी लोटुन गेला मधल्या कालावधीत मा. मुख्यमंत्री पातळीवर चर्चा करून ठोस निर्णय घेण्यात यावे, यासाठी राज्य संघटनेमार्फत सातत्याने वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. यामुळे प्रलंबित मागण्याबाबत कर्मचारी वर्गात असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. यामुळे कामगार संघटनेने पुकारलेल्या संपात सरकारी-निम सरकारी, जिल्हा परिषद, शिक्षक शिक्षकेत्तर, नगरपालिका-नगर परिषदा कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयासमोर भव्य निदेर्शने करण्यात येणार आहेत.

देशातील प्रधान १ १ कामगार संघटनांच्यावतीने ९ जुलै २०२५ रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. मार्च

२०२३ मध्ये झालेल्या बेमुदत संपाच्या पार्श्वभूमिवर दिलेल्या आस्वासनाची पुर्तता अद्यापर्यन्त शासन स्तरावरुन करण्यात आली नाही त्यामुळे कर्मचारी वर्गात संतापाची लाट उमलली आहे. तसेच शासनाने दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून राज्यातील सर्व विभागातील वर्ग १ ते ४ पर्यन्त कर्मचारी कंत्राटी कामगार नऊ कंपनीकडून भरण्याचे आदेश काढले आहे.

त्यामुळे भविष्यात सरकारी कर्मचारी राहणार नसून सर्व कंत्राटी कामगार असतील अशा शासनाच्या धोरणामुळे फारच भयानक परिस्थिती निर्माण होणार आहेष त्यामुळे प्रलंबित २० मागण्या बाबत ९ जुलै रोजी दुपारी १ ते ३ या दरम्यान मध्यवर्ती संघटनेचे निमंत्रक लिलाधर पाथोडे यांचे नेतृत्वात जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयासमोर भव्य निदेर्शने करण्यात येणार आहेत.

# आधार कार्ड, पॅन कार्ड आणि रेल्वे भाडेवाढ; होतायत मोठे बदल




AADHAAR

**नवी दिल्ली:-** १ जुलै २०२५ पासून, देशात अनेक मोठे बदल लागू होत आहेत, जे तुमच्या खिशाला, प्रवासाला आणि दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करतील. आधार-पॅन लिंकिंगपासून ते रेल्वे तिकीट बुकिंग, क्रेडिट कार्डचे नियम आणि बँक शुल्कांपर्यंत, सर्वत्र नवीन नियमांची चर्चा आहे. केंद्र सरकार, रेल्वे आणि बँकांनी मिळून अनेक नियमांमध्ये बदल केले आहेत. यापैकी काही तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात, तर काही तुमच्या खिशावर भार टाकू शकतात.

आधार-पॅन लिंकिंग आता आवश्यक

१ जुलैपासून नवीन पॅन कार्डसाठी आधार व्हेरिफिकेशन अनिवार्य झाले आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसच्या (उइउद्ध) या निर्णयानुसार, जर तुम्ही नवीन पॅन कार्ड बनवत असाल, तर आधार क्रमांक देणे आवश्यक असेल. तर, ज्यांच्याकडे आधीपासून पॅन कार्ड आहे, त्यांना ३१ डिसेंबरपर्यंत आपले आधार पॅनशी लिंक करावे लागेल, अन्यथा त्यांचे पॅन कार्ड निष्क्रिय होऊ शकते.

आयकर रिटर्न भरण्याची तारीख वाढली

एक चांगली बातमी अशी आहे की, उइउद्ध ने आयकर रिटर्न (खढठ) भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलैवरून १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. म्हणजेच, नोकरदार वर्गाला आता ४६ दिवसांचा अतिरिक्त वेळ मिळेल.

**रेल्वेमध्ये तत्काळ बुकिंग आणि तिकीट दरात बदल**

रेल्वेने आता तत्काळ तिकीट बुक करण्यासाठी आधार व्हेरिफिकेशन अनिवार्य केले आहे. तसेच, १५ जुलैपासून तिकीट बुकिंगसाठी (ऑनलाइन किंवा ऑफलाइन) टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन लागू होईल, ज्यात तुमच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर ओटीपी येईल. याशिवाय, रेल्वेच्या तिकीट दरातही किरकोळ वाढ होणार आहे. नॉन-एसी कोचसाठी १ पैसा प्रति किलोमीटर आणि एसी कोचसाठी २ पैसे प्रति किलोमीटरची वाढ होऊ शकते. तसेच, आरक्षण तक्ता आता ट्रेन सुटण्याच्या ८ तास आधी तयार होईल.

क्रेडिट कार्डच्या नियमांमध्ये बदल आपल्या प्रीमियम कार्ड्सवरून (SBI Elite, Miles Elite, B.) विमान तिकीट खरेदीवर मिळणारा हवाई अपघात विमा बंद केला आहे.

H$DF$C बँक: भाड्याचे पेमेंट, १०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचे ऑनलाइन स्किल-बेस्ड गेम्स आणि ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या युटिलिटी बिलांवर (विमा वगळून) १% व्यवहार शुल्क (transaction fee) लावेल.

ICICI बँक: खउखखउख च्या अढच वर पहिल्या पाच व्यवहारानंतर प्रत्येक पैसे काढल्यावर २३ रुपये लागतील. इतर बँकांच्या अढच वर, मेट्रो शहरांमध्ये तीन आणि लहान शहरांमध्ये पाच मोफत व्यवहारानंतर २३ रुपये (नगद काढल्यास) आणि ८.५ रुपये (गैर-वित्तीय व्यवहारासाठी) लागतील.

Axis बँक: मोफत मर्यादेनंतर इतर बँकांच्या एटीएममधून पैसे काढल्यास २३ रुपये प्रति व्यवहार शुल्क लागेल.

G$ST आणि RBI चे नवीन नियम

G$STNZoG$STR-३इ रिटर्न जुलैपासून मनॉन-एडिटेबलफ केले आहे. ते आता ऋडढठ-१/१अ डेटानुसार आपोआप भरले जाईल आणि सबमिट केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. तर, ठइख ने इंटरबँक कॉल मनी मार्केटची वेळ सायंकाळी ५ ऐवजी रात्री ७ वाजेपर्यंत वाढवली आहे.

# गोंदिया-नागपूर द्रुतगती मार्गाने उघडणार जिल्ह्याच्या समृद्धी अनब विकासाचे व्दार

**गोंदिया :-** समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तार करण्यात येत असल्याने जिल्ह्यात समृद्धी येण्याचा मार्ग मोकळा झाला. त्या पाठोपाठ आता गोंदिया-नागपूर द्रुतगती मार्ग तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) १६३ किमी लांबीच्या सहा लेनच्या नवीन द्रुतगती मार्गाचे बांधकाम करण्यात येणार आहे. यासाठी २१ हजार ६७० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. यामुळे गोंदिया नागपूर हा वाहनाने साडेतीन तासांचा प्रवास दोन तासांचा होणार आहे.

सध्या नागपूर-गोंदिया वाहनाने प्रवास करण्यासाठी साडेतीन तास लागतात. सध्या मार्ग अनेक गावातून गेला असल्याने या भागातून संथ गतीने वाहतूक असते. त्यामुळे प्रवासासाठी अधिक वेळ लागतो. पण, आता नागपूर गोंदिया द्रुतगती महामार्गामुळे दीड तासाच्या वेळेची बचत होणार आहे. हा मार्ग द्रुतगती मार्ग मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाचा विस्तार असेल. तो गावशी मानापूर (जामठा, नागपूर) येथून सुरू होईल आणि सावरी (गोंदिया) येथे संपेल. मुख्य मार्ग १४५ किमी, तिरोडा कनेक्टर १४ किमी आणि गोंदिया बायपास ४ किमी, असा एकूण १६३ किमी हा द्रुतगती मार्ग असणार आहे.



### जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळण्यास मदत

**गोंदिया जिल्ह्यात नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, हाजराफॉल, बोदलकसा, कचारगड, कुवाढास यांसारखी नैसर्गिक पर्यटनस्थळे आहेत. नागपूरवरून या पर्यटनस्थळी कमी वेळेत पोहचणे पर्यटकांना शक्य होणार आहे. त्यामुळे या मार्गामुळे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर नागपूर-गोंदिया प्रवास अधिक जलद व आरामदायक होणार आहे.**

### जमिनीच्या किमती वाढणार

**नागपूर-गोंदिया १६३ किमीच्या द्रुतगती मार्गासाठी एकूण १६०० हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यात गोंदिया, नागपूर आणि भंडारा जिल्ह्यातील काही गावांचा समावेश आहे. त्यामुळे या भागातील जमिनीच्या किमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे हा मार्ग जाणाऱ्या परिसराची संयुक्त मोजणी सर्वेक्षण जुलै अखेरीस पूर्ण केले जाणार असल्याची माहिती आहे.**

### शेतकऱ्यांना होणार मदत

**नागपूर-गोंदिया या द्रुतगती मार्गामुळे वेळेची बचत होणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात भाजीपाल्याचे उत्पादन घेतात. हा भाजीपाला ते नागपूर, बालाघाट व मध्य प्रदेशातील काही भागांत विक्रीसाठी पाठवितात. या नवीन मार्गामुळे भाजीपाल्याची जलद वाहतूक करण्यास शेतकऱ्यांना मदत होणार आहे.**

### ३० महिन्यांच्या कालावधीत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

**नागपूर-गोंदिया या १६३ किमीच्या द्रुतगती मार्गाचे काम ३० महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट एमएसआरडीसीने निश्चित केले आहे. तसेच, या महामार्गाचे बांधकाम समृद्धी महामार्गासारखे दर्जेदार करण्यावर भर दिला जाणार आहे. या मार्गावर सुरक्षाविषयक उपाययोजना प्रामुख्याने भर दिला जाणार आहे.**